# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ९६ वा ❑ भारतीय सौर दिनांक ०३ ज्येष्ठ शके १९४८, रविवार दि.२४ मे २०२६ ❑ पाने ६ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)

## विशेष लेख...

### आता पेट्रोल नव्हे, ईव्हीचा जमाना !

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

वाढत्या इंधन दरांमुळे आणि पर्यावरणविषयक जागरूकतेमुळे आता इलेक्ट्रिक वाहनांचा जमाना  आला आहे. ईव्ही हा केवळ एक पर्याय न राहता भविष्याची गरज बनली आहे. सातत्याने वाढणाऱ्या पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीमुळे सामान्य नागरिकांच्या खिशावर ताण येत आहे. तुलनेने इलेक्ट्रिक वाहनांचा चार्जिंग खर्च अतिशय कमी असल्याने इंधनावरील बचतीसाठी ई-वाहनांना पसंती दिली जात आहे. बाजारात आता एकापेक्षा एक आधुनिक फीचर्स, आकर्षक डिझाईन्स आणि एकाच चार्जिंगमध्ये जास्त अंतर देणाऱ्या गाड्या उपलब्ध आहेत. चार्जिंग सुविधांचा विस्तार: देशभरात वेगाने चार्जिंग स्टेशन्सचे जाळे  उभारले जात आहे.

पेट्रोल-डिझेलचे वाढते दर, घरच्या घरी चार्जिंगची सोय आणि कमी देखभाल खर्च यामुळे भारतात आणि महाराष्ट्रात इलेक्ट्रिक वाहनांची () मागणी वेगाने वाढत आहे. मे महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात इंधनावरील वाढत्या खर्चामुळे भारतीय बाजारपेठेत इलेक्ट्रिक दुचाकींच्या नोंदणीत १३.५ टक्क्यांची लक्षणीय वाढ झाली आहे, तर पेट्रोल वाहनांच्या विक्रीत ५.५ टक्क्यांची घसरण नोंदवली गेली. २०२३ च्या तुलनेत २०२५ मध्ये एकूण ई-वाहनांच्या संख्येत ४५.३३ टक्क्यांनी वाढ झाली असून, पूर्णतः बॅटरीवर चालणाऱ्या प्युअर ईव्ही श्रेणीला ग्राहकांनी सर्वाधिक पसंती दिल्याचे चित्र आहे. राज्यात गेल्या तीन वर्षांत वाढलेल्या ई-वाहनांमुळे दरवर्षी अंदाजे १.५ लाख टन कार्बन डायऑक्साइड उत्सर्जन टळू शकते. २०२५ मध्ये ईव्हीची संख्या विक्रमी १६९ टक्क्यांनी वाढली आहे.

ग्राहकांचा कल प्रामुख्याने ई-स्कूटर आणि ई-कारकडे जास्त आहे. इलेक्ट्रिक वाहन चालवण्याचा खर्च प्रति किमी केवळ ३० ते ५० पैसे येतो, जो पेट्रोलच्या तुलनेत अत्यंत कमी आहे. ई-वाहनांमुळे कार्बनचे उत्सर्जन कमी होते, ज्यामुळे हवा शुद्ध राहण्यास मदत होते.इलेक्ट्रिक वाहनांमधून विषारी धूर बाहेर पडत नाही. यामुळे हवेची गुणवत्ता सुधारण्यास मदत होते. हे वाहन अतिशय शांत चालतात, ज्यामुळे शहरातील ध्वनिप्रदूषण कमी होते.

सातत्याने महागड्या इंधनावर इलेक्ट्रिक हा एक उत्तम व शाश्वत पर्याय बनत आहे. ईव्हीच्या मागणीत होत असलेल्या या वाढीमुळे दरवर्षी लाखो टन कार्बन डायऑक्साइडचे उत्सर्जन टळत आहे.सुमारे ७० ते ८० लाख झाडे एका वर्षात जितका कार्बन शोषतात तितक्या प्रमाणातील प्रदूषणाची बचत या ई-वाहनांमुळे होऊ शकते. २०२४ मध्ये ८६,८५२ असलेल्या प्युअर ईव्ही वाहनांची संख्या २०२५ मध्ये थेट २ लाख ३३ हजार ७२८ वर पोहोचली आहे. पेट्रोल-डिझेलच्या किमती आणि पर्यावरणाबद्दलची जागरूकता यामुळे हायब्रीड तंत्रज्ञानालाही मोठी मागणी मिळत आहे. स्ट्राँग हायब्रीड आणि प्लग-इन हायब्रीड अशा दोन्ही प्रकारच्या गाड्यांची संख्या वर्षभरात जवळपास दुप्पट झाली आहे. वाढत्या ट्रेंडमुळे २०२६ च्या सुरुवातीच्या काळातच साधारण ४९ हजार ५३१ हून अधिक इलेक्ट्रिक वाहनांची नोंदणी पूर्ण झाली आहे.


राज्य आणि केंद्र सरकारकडून ईव्ही खरेदीवर सबसिडी (अनुदान) व कर सवलत मिळत आहे.

पेट्रोल आणि डिझेलच्या तुलनेत विजेचा खर्च खूपच कमी असतो, ज्यामुळे प्रति किलोमीटर धावण्याचा खर्च अवघ्या १ ते २ रुपयांपर्यंत येतो.कमी देखभाल यामध्ये पेट्रोल/डिझेल इंजिनसारखे अनेक फिरणारे भाग  नसतात. त्यामुळे ऑइल बदलणे किंवा इंजिनच्या दुरुस्तीचा खर्च खूप कमी असतो. विशेषतः मध्यमवर्गीय कुटुंबांमध्ये शाळेत जाणे, ऑफिसला जाणे किंवा भाजी आणण्यासाठी दुसरी गाडीम्हणून ई-स्कूटरला पहिली पसंती दिली जात आहे.

# बोनलेस चिकन – नक्की घडवलं कोणी?

ज्योतिर्मय साहित्य

नाव वाचून व्याकरणाची पहिलीच चूक वाटेल की, ही पाककृती किंवा तत्सम काही घडवलं असं कसं असू शकतं?? पण नाही जाणीवपूर्वक हा शब्दप्रयोग केला आहे कारण या बोनलेस चिकन बद्दल किंवा कणा नसलेल्या पिढी बद्दलच बोलायचं आहे. म्हणजे ही सगळी पिढीच वाईट आहे किंवा नालायक आहे असं अजिबात मला म्हणायचं नाही कारण जेव्हा एक बोट त्यांना नालायक ठरवतांना आपण त्यांच्याकडे दाखवतो त्यावेळी चार बोटं आपल्याकडे असतात हे एक भीषण वास्तव आहे.



नीटच्या परीक्षेत झालेले घोटाळे-घोळ याविषयी खूप लिहिलं-बोललं जातं आहे..अजूनही जात राहील. पण हा विषय, हा प्रश्न केवळ तितक्या पुरता मर्यादित राहिलेला नाही असं मला वाटतं. ९० पेक्षा अधिक टक्क्यांनी आपली सध्याची शिक्षण व्यवस्था आणि त्याचा मांडलेला बाजार आणि त्यामध्ये माझं बाळ कसं सर्वोत्तम आहे हे दाखवण्याची पालकांची केविलवाणी धडपड ही जास्त कारणीभूत आहे असं मला वाटतं.

काही वर्षांपूर्वी एक धोरण म्हणून राबविण्यात आलेला एक अतिशय मूर्खपणाचा निर्णय ज्याची फळं आपण भोगत आहोत आणि त्याचं नाव म्हणजे *आठवी पर्यंत सगळे पासच*. या निर्णयात कोण किती दोषी होतं, कोणाला किती फायदा झाला या विषयाकडे मला जायचं च नाहीये पण त्या निर्णयामुळे ना शिक्षकांना शिकवण्याची ईच्छा राहिली ना मुलांना शिकण्याची. काही नाही केलं तरी पास तर होणारच आहोत तर काय करायचं अभ्यास करून अशी एक बेदरकार मनोवृत्ती मात्र उदयास आली.

सगळा दोष शिक्षण व्यवस्थेच्या माथी मारून चालणार नाही कारण आपण पालक ही या सगळ्यांना तितकेच जबाबदार आहोत. कारण माझ्या मुलाला चित्रकलाच आवडते आणि गणित मुळीच आवडत नाही तर शाळेने किंवा शिक्षकांनी त्याला गणित शिकण्याची बळजबरी करू नये असे मानणारे च बव्हंशी पालक आहेत. नाही तिला हे करायचं ती ते करेल, नाही तिला ते आवडत म्हणून काय झालं आम्ही तिला अमुक एका गोष्टी साठी तयार करतोय अशा भ्रमाच्या भोपळ्याची शेतीच आपण करत आहोत.

आणि मग अचानक एक दिवस उगवतो ज्यात पालकांना अचानक आठवत की, अरेच्च्या आपलं मूल आठवी झालं..चला चला त्याला फाउंडेशन लावूया,  त्याला आत्ता पासून  किंवा  सारख्या क्लासेस ला घालूया. आणि मग त्या मुलाला किंवा मुलीला *हात दाखवून रिक्षा थांबते* हे जरी माहित नसेल तरीही त्याच्याकडून त्याच्या सध्याच्या शैक्षणिक वर्षाच्या आणि त्यापेक्षा पुढे असलेल्या ४-५ वर्षांचा अभ्यास करता आला पाहिजे अशा अपेक्षांचे ओझे आपण त्या नाजूक खांद्यावर टाकून मोकळे होतो. नाजूक खांदे या करता म्हणलं कारण आपणच त्यांना त्यांच्या मर्यादेपर्यंत नेलं नाहीय, त्यांना साध्या गोष्टींमध्ये जुळवून घेण्याची सवय लावली नाहीये. नको ना तुला उपमा मग खा मॅगी असं वाढवलं आहे आणि मग ज्यावेळी सगळं अचानक समोर येतं तेव्हा ही बाळं गांगरून जातात.

आणि याच सगळ्याचे भांडवल करणे किंवा ही नाडी ओळखून आपल्या पदरात खोऱ्याने पैसा पाडून घेण्याचे काम हे मोठमोठे क्लास वाले करत आहेत. आणि  मग माझ्या मुलाने दहावीला केवळ दोन महिने अभ्यास करून ९०-९२+ टक्के मिळवले म्हणजे आता  किंवा  साठी पायघड्याच घातल्या जातील अशा एका मस्तीत पालक लोक येत आहेत.

पण या पिढीच्या पालकांनी जरा मागे वळून बघावं की, आपल्यावेळचे ८०-९० टक्के आणि यांचे ८०-९० टक्के यात प्रचंड तफावत आहे. अभ्यासक्रम बघितला मग तो कोणताही बोर्ड असो, इतका सोपा करून ठेवलेला अभ्यासक्रम किंवा इतक्या सोप्या परीक्षा खरंच आपल्यावेळी होत्या का हो?

आणि आपल्या वेळी आणि यांच्या वेळी अशी तुलना करायची नसेल तर मार्कांची तरी तुलना कशासाठी? आणि पालकांच्या याच मानसिकतेचा फायदा या क्लासेस वाल्यांनी घेतला आहे. एक अत्यंत सुंदर वाक्य ते तुमच्या डोक्यात पेरतात की, ''तुमचं मुल हुशार आहे,आमच्या सारख्या तज्ञ शिक्षकांची जोड, अनुभव याची मदत घेतलीत तर अवघड गोष्टी पण करून घ्याल आणि नाही अवघड झालं तरी सोपं तर होणारच आहे.'' आणि या भूलथापांना बळी पडण्याचे काम आपण इमानेइतबारे करतो.

आणि त्याचा कळस म्हणजे ज्याक्षणी या भ्रमाच्या भोपळ्याची फ ुटण्याची शक्यता दिसू लागते तेव्हा आपले प्राण कंठाशी येतात. कारण *लोग क्या कहेंगे*...

विदूला काटे
शैक्षणिक विशेषज्ञ, पुणे

आणि मग या बोनलेस चिकन ना जर उभं ही राहता येत नसेल तर मी त्यांच्यासाठी वाटेल ती किंमत मोजून, वाटेल त्या नैतिक अनैतिक वाटा घेऊन, प्रसंगी एखाद्याच्या खरोखर गरिबीचा, लाचारीचा फायदा घेऊन माझ्या बोनलेस चिकन ला नुसतं उभं करणार नाही तर त्याला यावेळी राज्य करायला लावणार अशी मानसिकता तयार होते.

''मी इतकी हुशार किंवा मी इतका यशस्वी आणि माझं मुल तसं नाही'' ही कल्पनाच करवत नाही आणि मग एक, दोन करत करत अगणित कुबड्यांचा आधार घेतला जातो आणि आपलीच लाचारी वारंवार सिद्ध करू लागतात पालक. आणि मग असे कित्येक क्लासवाले यावर श्रीमंत होतात, ज्याला पर्याय नाही.

मग सगळंच आपल्या हातातून निसटलंय का? तर नाही..थोडं थांबा अगदी निष्कर्षाला येऊ नका पण झालेल्या चुकांवर पांघरूण घालण्यापेक्षा त्यावर उपाय शोधले तर जास्त बरे होईल असे मला वाटते.

माझ्या दृष्टीने उपाय म्हणजे,

१.मातृभाषेतून शिक्षण असायला हवं. आता तुम्ही म्हणाल की हे काय मधेच? तर हे मधेच नाही, आताच्या यशस्वी लोकांची यादी काढली तर त्यांच्या मातृभाषेतून शिक्षण ही त्यांच्या यशाची गुरुकिल्ली आहे.

आणि त्यामुळे मुलाची प्रगती ही त्यामानाने लवकर कळेल असं मला वाटतं.

२. मुलांना नाही म्हणलं जाण्याची, अपयश येण्याची मानसिक तयारी करून घ्या. मुलांची पण आणि आपली स्वतःची देखील. कारण तरच आपल्या अवास्तव अपेक्षांचं ओझे मुलांना दाबून टाकणार नाही किंवा मिळालेलं यश त्यांच्या डोक्यात जाणार नाही.

३. मुलांना नापास होण्याची भीती, शिक्षकांनी रागवण्याची भीती असू द्या. आपलं बालपण या मुळेच सुसह्य झालं असं मला वाटतं. म्हणजे ज्या त्या वयाला जशी ज्या त्या वयाची सोबत गरजेची असते तशी त्या त्या वेळी तशी भीती,धाक ही आवश्यक असतो. त्यासाठी रोज मारझोड करायची गरज नक्कीच नाही परंतू अपयशाची सवय नसेल आणि ते अचानक समोर आलं तर आत्महत्येच्या विचाराशी तरी संधान बांधलं जाणार नाही हे नक्की.

४. आपली स्वप्न आणि आपल्या मुलांची इच्छा,  स्वप्न,ध्येय, व्यवधान आणि संधी या खूप वेगळ्या आहेत आपल्यापेक्षा. त्याची जाणीव जितक्या लवकर स्वीकाराल तितका लवकर मार्ग सापडेल या सगळ्यातून.

असो.. यात मी माझी मतं मांडली आहेत. कदाचित तुमची मतं वेगळी असू शकतात. पण एकेक पाऊल टाकत आपण अशा प्रकारच्या दुष्ट प्रवृत्तींना आळा नक्कीच घालू शकतो. बघा पटलं तर घ्या. नाहीतर सोडून द्या.

# लिंब गावचे दत्तात्रय सावंत

ज्योतिर्मय साहित्य



लिंब गावचे दत्तात्रय सावंत हे १९९५ च्या सुमारास माझ्या 'लोकमंगल ग्रुप' शिक्षण संस्थेच्या लोकमंगल माध्यमिक विद्यालय नागेवाडी-कुशी या ठिकाणी शिक्षक म्हणुन रुजू झाले. गणित, खेळ आणि संगीत यामध्ये असणारे प्रभुत्व त्यांनी शाळेतल्या विद्यार्थ्यांना पूर्ण वेळ देऊन त्यांच्याकडून गुणात्मक तयारी करून घेतली. ही शाळा नावारूपाला आणण्यात त्यांचा मोठा सहभाग. सध्या ते लोकमंगल विद्यालय-गेंडा माळ येथे त्या शाळेचे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत आहेत. गेल्या महिन्यात त्यांच्या साताऱ्यातील घरी आम्ही गेलो होतो. त्यांचा मुलगा मंथन जर्मन देशात उच्च शिक्षण घेत आहे. त्यांच्या घरी मला ५५ इंची नवीन टीव्ही दिसला. सावंत सर सांगत होते. मंथन जर्मनीमध्ये मास्टर्सचा अभ्यास करताना पार्टटाइम जॉब करून स्वतःचा खर्च आपल्या उत्पनातून भागवितो आणि त्याने त्याच्या पहिल्या पगारातून आम्हाला हा टीव्ही सरप्राईज म्हणून पाठवलाय. तसेच त्याने त्याच्या आईच्या वाढदिवशी सॅमसंगचा मोबाईल फोन कव्हरसह तिला पाठवलाय. इस्त्री आणि मिक्सर हेही आलेय. ऑक्टोंबर २०२५ मध्ये जर्मनीत जाऊन पहिली सेमिस्टर डिस्टिंगशन मध्ये पास होऊन आपल्या घरी ज्या वस्तू नाहीत त्या स्वतःसाठी कोणतीही चैन न करता साताऱ्याच्या घरी पाठविण्यातील भावनिकता मला प्रचंड भावली. सध्याची युवा पिढी किती भावनाशील आहे हे या उदाहरणावरुन आपल्या लक्षात येते.

घार उंच आकाशी फिरते, तरी तिचे लक्ष पिलांकडेच असते असे आपण आई-वडीलांबद्दल म्हणतो. तसेच मुलांचे मन खेळात, शिक्षणात – नोकरीत असले, तरी त्यांची ओढ घराकडेच राहते.  घार कितीही उंच उडत असली तरी तिचे संपूर्ण लक्ष तिच्या पिलांवरच असते, हे मातृत्वाचे प्रतीक आहे.  तसेच मुलं खेळण्यात किंवा बाहेर रमली तरी त्यांच्या मनात घर, आई-वडील यांच्याबद्दल प्रेम आणि ओढ कायम असते, हे अशा उदाहरणामुळे प्रकर्षाने जाणवते. मुलांचे लक्ष शिक्षण, करिअर आणि नोकरीत गुंतलेले असले तरी त्यांच्या मनाचा एक मोठा भाग नेहमीच घराकडे, आई-वडिलांकडे आणि बहीणभावाकडे असतो. जीवनात प्रगती करण्यासाठी ते घरापासून दूर जातात, नवीन ठिकाणी राहतात, नवीन जबाबदाऱ्या स्वीकारतात; परंतु भावनिक नात्यांची ओढ कमी होत नाही. आई-वडिलांनी दिलेले संस्कार, प्रेम आणि आधार यामुळे मुलांना नेहमीच घराची आठवण येत राहते. बहिण-भावासोबतचे आपुलकीचे नाते, बालपणीचे क्षण आणि कुटुंबातील जिव्हाळा त्यांच्या मनात कायम जिवंत असतो. त्यामुळे कितीही व्यस्त दिनचर्या असली तरी ते वेळ काढून फोन करणे, विचारपूस करणे किंवा घरी येण्याचा प्रयत्न करतात. यातून हे स्पष्ट होते की शिक्षण आणि नोकरी ही आयुष्याची गरज असली तरी कुटुंब हीच खरी भावनिक ताकद असते, जी मुलांना सतत जोडून ठेवते.

सातारा शहरात जन्मलेल्या मंथन दत्तात्रय सावंत या मुलाचा प्रवास आज अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. मध्यमवर्गीय शिक्षक कुटुंबातील हा मुलगा आज जर्मनीमध्ये उच्च शिक्षण घेत असून एम्बेडेड सिस्टिम्स आणि सेमीकंडक्टर क्षेत्रात मोठे स्वप्न पाहत आहे. मंथनचा जन्म सातारा येथे झाला. वडील दत्तात्रय मारुती सावंत आणि आई मीना दत्तात्रय सावंत हे दोघेही शिक्षक. घरची परिस्थिती खूप श्रीमंत नव्हती, पण मुलाने मोठं व्हावं, चांगल्या वातावरणात शिकावं आणि इंग्रजी माध्यमातून शिक्षण घ्यावं हे त्याच्या वडिलांचे मोठे स्वप्न होते. त्यामुळे त्यांनी अनेक अडचणींना सामोरं जात साताऱ्यातील नामांकित मोना स्कूल या शाळेत मंथनला प्रवेश मिळवून दिला. ''मुलाचं शिक्षण हेच भविष्य'' या विश्वासाने आई-वडिलांनी त्याला प्रेरणा दिली.मंथन लहानपणापासूनच खूप उत्साही. क्रिकेटची त्याला प्रचंड आवड. मित्रांमध्ये राहणे, खेळणे, स्पोर्ट्समध्ये भाग घेणे हे त्याच्या आयुष्याचा भाग होते. त्याला क्रिकेटमध्ये पुढे जायची इच्छा होती. पण जसजसा अभ्यास वाढत गेला तसतसे त्याने स्वतःला अभ्यासाकडे पूर्णपणे वळवले. शालेय जीवनात मंथनला चांगले मित्र मिळाले. दहावीच्या परीक्षेत त्याने ९४% गुण मिळवले आणि आई-वडिलांच्या कष्टांचे चीज केले.

झेप....
शिरीष चिटणीस
सातारा ७५८८८६५०५१



दहावीनंतर मंथनने पुण्याकडे वाटचाल केली. साताऱ्यातून पुण्यासारख्या मोठ्या शहरात जाणे हे त्याच्यासाठी मोठे पाऊल होते. त्याने गव्हर्नमेंट पॉलीटेकनिक पुणे येथे इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन विभागात प्रवेश घेतला.

पुण्यातील शिक्षणामुळे त्याला इलेक्ट्रॉनिक्स, गॅजेट्स, बॅटरीज, सर्किट्स आणि प्रत्यक्ष तांत्रिक ज्ञानाची प्रचंड आवड निर्माण झाली. वस्तू आतून कशा काम करतात, इलेक्ट्रॉनिक डिव्हाइसेस कसे तयार होतात याविषयी त्याच्या मनात कायम कुतूहल असायचे. डिप्लोमामध्ये त्याने ९१.५% गुण मिळवून स्वतःची गुणवत्ता सिद्ध केली. मंथनला आता स्पष्ट झाले होते की आपले करिअर इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातच घडवायचे आहे. त्यामुळे पुढे त्याने  अकादमी ऑफ इंजिनीरिंग येथे बी.टेकसाठी प्रवेश घेतला. इंजिनिअरिंगच्या काळात त्याने केवळ अभ्यासच केला नाही, तर नवीन गोष्टी शिकण्यावर भर दिला. रोबोटिक आर्म या प्रोजेक्टवर त्याने काम केले आणि त्यावर रिसर्च पेपरही प्रकाशित केला. त्याच्या मेहनतीमुळे त्याला ९.३०  मिळाले. कॉलेजमधील प्राध्यापक आणि डीन मॅडम यांनी त्याला पुढील उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले.

(क्रमशः)




# जात्यावरच्या ओव्या......

काय सांगू महती
खाटावर बसले सासरे
लेकी, सुना, नाती, जावा
पदर घेऊन वापरे ||६५७||

काय सांगू महती
पितळी कडीला कुलुप
कवाडाला कारागिरी
आला पाहून हुरूप ||६५८||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ३३





विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

**ज्योतिर्मय साहित्य**

जोपर्यंत ही सृष्टी अस्तित्वात आहे तोपर्यंत तारे, चंद्र, सूर्य आपल्याला प्रकाश देत राहतील. मेघ जलाचा वर्षाव करत राहतील. ही भूमाता आपल्यासाठी अन्न निर्मिती करील. शतकानुशतके युगानुयुगे या गोष्टी होत आल्या आहेत आणि होत राहतील. परंतु या सृष्टीवर मानवासहित जे सर्व सजीव प्राणी, वनस्पती जन्माला आले आहेत ते सर्व मर्त्य आहेत. त्यांना मृत्यू अटळ आहे.

**जिवासवें जन्मे मृत्यू, जोड जन्मजात**
**दिसे भासतें तें सारें विश्व नाशवंत**

या गीतरामायणातील ओळी मानवी जन्म आणि मृत्यू हे कसे एकमेकांशी निगडित आहेत हे सांगतात.



या जगात जो जन्माला आला त्याला एक दिवस मृत्यू आहेच हे निश्चित. पण असे असले तरी भगवंताने आपल्या दोन दासांना चिरंजीवित्व प्राप्त करून दिले. या जगामध्ये सात व्यक्ती चिरंजीव आहेत असे मानले जाते.


**अश्वत्थामा बलिर्व्यासो हनुमानश्च बिभीषणः।**
**कृपाः परशुरामश्च सप्तैते चिरंजिविनः।।**

अश्वत्थामा, बळीराजा, वेद व्यास, हनुमान, बिभीषण, कृपाचार्य आणि परशुराम हे ते सप्त चिरंजीव. यातील हनुमान आणि बिभीषण हे दोघे निस्सीम श्रीरामांचे भक्त आहेत. हनुमंताचा जन्म वानर कुळातील तर बिभीषण राक्षस कुळात जन्मलेला. हनुमंत श्रीरामांचा निष्ठावान सेवक आहे हे आपण जाणतो. बिभीषणाची गोष्ट मात्र जरा वेगळी आहे. त्याचा जन्म राक्षस कुळात झालेला आणि महापराक्रमी रावणाचा तो सख्खा भाऊ. अन्यायी अशा रावणाची साथ सोडून श्रीरामांच्या पक्षात येणे ही गोष्ट त्याच्यासाठी एवढी सोपी नव्हती. परंतु तरी देखील त्याची रामावर असणारी श्रद्धा एवढी प्रचंड होती की तो हा सगळा विरोध सहन करून श्रीरामांना शरण आला. रामाने रावणाचा वध केल्यानंतर श्रीरामांनी लंकेचा राजा व्हावे अशीही इच्छा बिभीषणाने व्यक्त केली होती. एवढा तो रामभक्त होता.

हनुमंत आणि बिभीषण या दोघांचेही स्वभाव आणि कर्म वेगवेगळे होते. परंतु या दोघांमध्ये एक गोष्ट मात्र समान होती. ती म्हणजे ते दोघेही श्रीरामांचे परमभक्त होते. त्यांच्या अपार भक्तीमुळे श्रीरामांनी त्यांना चिरंजीव केले. जन्म मृत्यूच्या फेऱ्यातून त्यांची सुटका केली. या मृत्यू लोकात जन्म घेऊनही ते अमर झाले ही फक्त श्रीरामंचीच कृपा !

खरी निष्ठा आणि भक्ती कशी असते आणि अशा भक्तांवर प्रभू श्रीराम कशी कृपा करतात हे या उदाहरणातून समर्थांनी आपल्या निदर्शनास आणून दिली आहे. आणि म्हणून ते पुन्हा आपल्याला सांगत आहेत की श्रीराम हे दासाभिमानी आहेत. आपल्या भक्ताची ते कधीही उपेक्षा करीत नाहीत.

स्वसंवाद : १) हनुमान आणि बिभीषण यांच्या इतकी भगवंताची भक्ती कदाचित मला जमणार नाही. परंतु किमान त्या मार्गावर चालावे असे तरी मला वाटते का ? २) ही सृष्टी भगवंताची लीला आहे असे मी मानतो का? ३) निसर्गाच्या विशालतेकडे पाहताना माझ्या मनात परमेश्वराप्रती कृतज्ञता येते का की मी ते गृहीत धरतो ? ४) चिरंजीव होणे म्हणजे जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून मुक्ती. माझ्या भक्तीचे ध्येय केवळ सांसारिक सुखापुरते आहे की मोक्षापर्यंत पोहोचण्याची माझी खरी इच्छा आहे ? **(क्रमशः)**




ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏
ॐ नमो भद्रा हनुमते नमः🙏🙏

## || संजय उवाच... ||


@संजय काव्या पुणे 7743918559



✍ वेळ

वेळेचे आयुष्यात खूप मोल आहे त्यामुळे प्रत्येक क्षणाचे महत्त्व सार्थकी लावा, वेळेच्या सोबत जो चालतो तो ध्येयापर्यंत निश्चित पोहोचतो. वेळ कोणतीच वाईट नसते, आपण आपला दृष्टिकोन पॉजिटीव्ह ठेवायचा.

# अखंड समाधानाचा मार्ग : नामस्मरण: वृद्धांना उपदेश



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

**ज्योतिर्मय साहित्य**

अखंड रामसेवा ज्याला लाभली । धन्य धन्य त्याची माउली ।। स्वार्थरहित रामसेवा । याहून दुजा लाभ न जीवा ।। वाचेने भगवंताचे नाव । कायेने भगवंतसेवा । चित्ती भगवंताचे ध्यान । आपण रहावे रामार्पण । याहून अन्य सेवा । कोणतीही नाही जाण ।। जे जे दिसते ते ते नासते । हा बोध घेऊनि चित्ती । सज्जन लोक जगी वर्तती । तैसे तुम्ही आता वागा जगात ।। मुलां-बाळांस सांभाळून राहावे । प्रपंचात उदास न व्हावे ।। प्रपंचाची उपाधि । आता मनात न आणावी ।। उपाधिवेगळे झाला । ऐसे ऐकू द्यावे मला ।। उपाधीत राहिला । परि चित्ताला न वास दिला । ऐसे ठेवा मनी । राम आणावा ध्यानीं । आता यापरतें हित । नाहीं दुसरे जगांत । हा माझा बोल । न मानावा फोल ।। आता रामा तुझा झालो । कर्तेपणातून मुक्त झालों । ऐसें आणावे मनांत । शक्य तितके राहावे नामात । याहून दुसरें न आणावे मनांत ।। लौकिकांतील मानापमान । यांचे सोडावें उदक । ध्यानीं आणावा रघुनंदन एक ।। बायको-मुलांबाळांत राहावे । चित्त रामाकडे ठेवावें । होईल तेवढे नाम घ्यावें ।। अंतरी परमात्मा त्यास । ठेवून साक्ष भावे भजावे रघुनाथास । न सोडावा मनाचा धीर । मागे आहे रघुवीर ।।

वृद्धपण आलें । शरीर क्षीण झालें । तरी आपण अभिमान घेऊनच राहिले । त्यास सोडावें दूर । प्रपंचांत वृद्धपणीं न पाहावें । मुलांस मार्ग दाखवून सुखी राहावें । औषध पथ्यपाणी सांभाळावें । पण दुःखी कष्टी कधीं न व्हावें ।। शरीरसंपत्ति क्षीण झाली । तरी वृत्ति क्षीण नाही बनली ।। जोवर देहाची संगति । तोवर 'मी-माझें' ही वृत्ति ।। आता वृत्ति राखावी रामापाशी । दुजी उठू न द्यावी त्यापरती ।। आजवर जें घडलें । ते प्रापंचिक, पारमार्थिक असो भले । तें रामकृपेने झाले । हे ठेवावे चित्तीं । आता न सोडावा रघुपति ।। वयोमानानें शरीर होतें क्षीण । वागणें आहे फार जपून ।। देह आळशी न ठेवावा हे जरी खरें । तरी त्याची परिस्थिति ओळखून राहणे हे बरे ।। आता आपण झालो शरीराचे अधीन । हे वयोमानानें दृश्य भासत । तरी भाव ठेवा रामापायीं । ज्याला क्षीणता कधीं आली नाहीं ।। चित्तीं राखावें समाधान । आनंदानें संसार करावा जाण ।। समाधानाचें करावे जतन । ते नसावें कशावर अवलंबून ।। लाभहानींत न गुंतवता मन । राखता येईल समाधान ।। समाधानाला अडवणूक जाण । माझा मीच आपण ।। देहाचे भोग ठेवावे देहाचे माथीं । समाधानांत राखावी वृत्ति ।। सर्व कर्ता राम हा भरवसा ठेवावा ठाम । मग काळजींचे उरलें नाहीं काम । हे सर्व जुळतें म्हणतां राम राम ।। तरी सर्वांनीं घ्यावे रामनाम । व्हावें परमात्म्याचे आपण । कृपा करील रघुवीर ।।

मागणे तुम्हा एकच पाही । नामावाचून दूर कधीं न राही ।।

## || अध्यात्म ||

मधुकर बोरीकर,
पुणे

### ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी निर्मितीचे प्रयोजन कोणते?

पुढे.....
या ग्रंथाची निर्मिती करणारे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली हे याच कार्यासाठी म्हणजे ज्ञानेश्वरी ग्रंथ निर्मितीसाठी अवतरीत झाले हे आपण सर्वप्रथम मान्य करूयात. कारण हा दिव्य ग्रंथ निर्माण झाल्यावर त्यांनी आपले इती कर्तव्य पार पडले असे जाणून इहलोकीची यात्रा संजीवनी समाधी घेऊन पूर्ण केली.

निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान व मुक्ता ही चार अलौकिक भावंडे त्यांचे पूर्व जन्मातील संचित, प्रारब्ध व क्रियमान कर्मे भोगून व तपाच्या योगे पूर्णपणे संपवून मागील जन्मातच मुक्त झाली होती.ज्ञानेश्वर माऊली तर आपल्या हरी पाठात आपण "मागिलीया जन्मा मुक्त झालो" असे नि:संदिग्ध पणे ग्वाहीच देतात.अशे जीवन्मुक्त महात्मे हे केवळ प्रभू इच्छेने लोक कल्याणा साठी या भूतलावर जन्म घेतात. एरवी त्यांना त्यांची कर्म बंधने संपल्याने नवीन जन्म घेण्याची गरज उरत नाही.

आपणास असा प्रश्न पडू शकतो की ज्ञानेश्वर महाराज यांना ते आधीच मुक्त झालेले असताना प्रभू आज्ञेने जन्म का घ्यावा लागला? त्यांच्या जन्माचे प्रयोजन काय होते? लोक कल्याण करण्यासाठी म्हणावे तर ही गरज तर सर्वकालिक आहे.मग त्या वेळेसच का?

या प्रश्नाचे उत्तर आपणास खालील अभंगात सापडते. क्रमश:........

## सुख दुःखाचे तरंग माणसा-माणसाचे



✍वसंत कुलकर्णी,
छ.संभाजीनगर,
मो. 96730 67194

### ♦जीवनाचे नवरंग जाणा

समाधान रंग भरेल, तुमच्या जीवनी सुखसमृध्धीचे/
धन संपत्ती संस्कार यामधे, मूल्य नेहमी जास्त संस्काराचे सोन्याच्या मोत्याच्या हारापेक्षा
मानव शोभून दिसतो घामाने. तीच नाती जास्त टिकतात, जी साथ सोडत नाही जीवनी
ईतिहासात भविष्य कशाला शोधायचे/
भविष्यात इतिहास घडवायचे, हेच तर आहे तुमच्या हातचे/
आरशासारख स्वच्छ प्रामाणिकपणे नाती,
चुकल्यावर कान व यश मिळाले की पाठ थोपटतात/ चांगल्या वेळेपेक्षा चांगली माणसं महत्त्वाची, कारण त्याच्या संमतीने चांगली वेळ
येते/जो माणूस कष्टाला, प्रयत्नाला लाजत नाही, त्याला जगात यशस्वी होण्यापासून कोणी थांबवू शकत नाही... आपण दुसर्यासाठी असावं मीठ.. ते नसेल तर जेवण जात नाही नीट! चांगले असणं व चांगले वागणं हे स्वत: एक वरदान आहे. तुमच्या ह्रदयातल्या मंदिरात अंधार असेल तर/ जगातल्या कितीही मंदिरात दिवे लावले तर त्याचा काही ऊपयोग नाही! ना सुखाचे तरंग वाढत नाही ना दुःखाचे तरंग कमी होत नाही.. म्हणून नो टेन्स, टेक ईट ईझी. आनंदी राहा स्वस्थ राहा मस्त राहा सुख दुःखाचे तरंग वाचत राहा. गूड़ डे.. गुड मार्निंग.




# घशातील जंतुसंसर्ग

**ज्योतिर्मय साहित्य**

उपाययोजना

१) घशाची सूज उतरण्यासाठी आपल्याला गरम पाणी पिण्याचे व हळद मिठाच्या पाण्याच्या गुळण्या करा. २) सुंठ, गवती चहा, ज्येष्ठमध, हळद, पुदिना यांचा चहा करा लिंबू पिळून प्या.

३) घशाला झालेले इन्फेक्शन घालवण्यासाठी पेरूचे पान अत्यंत उपयुक्त आहे. पेरूच्या पानात आयुर्वेदिक गुणधर्म आहेत. ते चाऊन अथवा उकळून रस प्या. ४) थंडीमध्ये घशाचे इन्फेक्शन होणे ही अतिशय सामान्य समस्या आहे. याच्या जोडीला येणारा ताप, सर्दी यामुळे आपण हैराण होऊन जातो. पण वाफ घेणे हा यारील सोपा उपाय आहे. घरच्या घरी गरम पाणी करुन त्याची वाफ घेतल्यास घशाला आराम पडतो. दिवसातून दोन ते ती वेळा हे केल्यास इन्फेक्शन कमी व्हायला मदत होते. ५) घसा दुखत असल्यास काहीतरी गरम पिण्याची इच्छा होते. अशावेळी गरम काढा प्यायल्यास त्याचा निश्चित फायदा होतो. काढा मध्ये तुळस, लवंग, आले घातल्यास घशासाठी तो जास्त उपयुक्त होतो. असा काढा दिवसातून २ वेळा घेतला तरी घशाला आराम मिळतो. ६) दोन मिर्याची पुड किंचित हळद, किंचीत काथाची पुड मधात घ्यावी. ७) काथाची फुड गरम पाण्यात घेतल्यास घसा सुटतो. ८) गरम पाण्यात एक लिंबू रस घ्यावा ९) लसणाची पाकळी पिठी साखरेत घालून खायची. १०) मध व जेष्ठीमध पावडर, व हळद, कोरफडीचा गर आवाजा साठी एकत्र करून चाटावा. दोन वेळा. ११) घसा दुखत असल्यास आल्याचा तुकडा तोंडात ठेऊन चावा. त्यामुळे तुम्हाला लवकरआराम मिळेल. १२) आल्याचे चार तुकडे, दोन टोमॅटो, मध यांचा रस करुन प्या.

१३) पाण्यात कांदा टाकून उकळा व गाळून त्यात कोमट झाल्यावर मध टाकून ते पाणी थोडयाथोड्या वेळाने प्या. १४) मधात काही लवंगा टाका. काही तासांनी लवंगा काढून त्याचे चाटण खा. लवंगामुळे वेदना कमी होतील व मधाने घशाला आराम मिळेल. (१५) पाण्यात बडीसोप टाकून ते काही मिनीटे उकळा त्यानंतर पाणी गाळून घ्या व त्यात मध टाकून थोड्या थोड्या वेळाने प्या. १६) लिंबाचा रस व एक चमचा मध टाकलेले कोमट पाणी प्या. १७) पुरेसा आराम करा. व्यवस्थित आराम केल्यामुळे शरीर इनफेक्शनला प्रतिकार करु शकते.

आयुर्वेदिक उपाययोजना

१)खदिरादी वटी एक एक गोळी खडीसाखरे सोबत. यामुळे घसा सुजणे, पडजीभ सुजणे, ढास लागणे, घशातील खवखव, खरखर, कफ न सुटणे, घसा लाल होणे यात आराम मिळतो २) एलादी वटी एक एक चार वेळा घेतल्यास ही लवकर फरक पडतो. ३) पोटातील अन्नरस घशात येऊन जळजळ आग आग होत असेल तर. जेवल्यानंतर अर्धा चमचा अविपत्तीकर चुर्ण थंड पाण्यात घ्या सोबत. व प्रवाळपंचामृत एक एक गोळी पाव कप दूधात घ्या. अनेक लोकांना घशाच्या जळजळीचा त्रास आहे टेस्ट नॉर्मल येऊन ही कारणं कळत नाही की घशात का जळजळ होतेय त्यानी हे उपाय केल्यास निश्चितच फरक दिसेलच.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

# प्रभातपुष्प

## षटकोळी माझी

संध्याराणी जयहिंद कोल्हे {काव्यसंध्या}
कळंब जि.धाराशिव मो. 87885 91371

### उजाड माळरान

उन्हाळ्यात सर्वत्र पाहता
दिसे उजाड माळरान
मन उदास होते
नि:शब्द शांतता पसरलेली
हिरवळ नसे कुठे
काहीच ना सुचते

उजाड माळरान पाहूनी
हिरवळीची आठवण होवून
कंटाळवाने जीवन होते
उष्णतेचा होतो त्रास
घसा कोरडा पडल्याने
पाणी प्यावे वाटते

# डॉ. नागेश अंकुश : मराठी अचूक लेखनासाठीचा अथक ध्यास !

ज्योतिर्मय साहित्य

प्रमाण/अचूक मराठी म्हणजे काय आणि त्याचे आत्यंतिक महत्त्व सातत्याने मराठी भाषिकांना सांगत राहाणे आवश्यक आहे. वेगवेगळ्या प्रकारे लिहिले/वाचले तर मुळात शब्दांचे, भाषेचे अर्थच कळणार नाहीत. सदोष भाषेचे संक्रमण पुढच्या पिढ्यांकडे होईल, ह्यासाठी प्रमाण भाषेचे महत्व अधोरेखित करणे गरजेचे आहे. ह्याच ध्येयाचा मनोमन ध्यास घेणारे एक मराठीचे प्राध्यापक पुण्या–मुंबईसारख्या 'मेन स्ट्रीम' मध्ये नाही; परंतु मराठवाड्यातील (संभाजीनगर) एक भाषा अभ्यासक डॉ. नागेश अंकुश हे स्वतःचे अध्यापनाचे कार्य करत असतानाच मराठी लिखित कशी वापरावी, यासाठी वेगळे असे सामाजिक कार्य करत आहेत, ही बाब आजच्या काळात खूप कौतुकास्पद आणि उल्लेखनीय आहे. सुप्रसिद्ध आधुनिक वर्तनशास्त्र प्रशिक्षक रविबाला काकतकर यांचा हा विशेष लेख

अनेकदा रस्त्यांवरील पाट्या, दूरदर्शनवर झळकाणारी अक्षरे, काही वृत्तपत्रे, नियतकालिके देखील मराठीच्या अचूक लेखनाची काही वेळा हेळसांड करताना दिसतात, तेव्हा मराठी भाषेवर प्रेम करणाऱ्या प्रत्येकाच्या मनात खूप खंत वाटत राहते,.

अमराठी लोकांना, प्रमाण आणि अचूक मराठीचे नियम कठीण वाटतात, ही बाब दुर्दैवाने मान्य करावी लागते हे खरे. तळागाळापर्यंत जसजसे शिक्षण पोहोचू लागले, तस तसा मराठीचा आणि शिक्षणाचा प्रसार वाढू लागला, ही आनंदाची बाब आहे. त्यासाठी प्रमाण मराठीऐवजी सर्वसामान्यांच्या भाषेतच लिहिले आणि बोलले तर बिघडले कुठे? हा विचार हळूहळू वाढतो आहे. त्याचमुळे प्रमाण मराठी



म्हणजे, शहरातली वा उच्चभ्रू वा विशिष्ट समाजाची मराठी. ती वापरण्याची आमच्यावर सक्ती नसावी, असे क्रांतिकारी विचार आज प्रसिध्द लेखक, दिग्दर्शक मांडू लागलेले दिसतात. असे असताना प्रमाण / अचूक मराठी म्हणजे काय आणि त्याचे आत्यंतिक महत्त्व सातत्याने मराठी भाषिकांना सांगत राहाणे आवश्यक आहे. वेगवेगळ्या प्रकारे लिहिले / वाचले तर मुळात शब्दांचे, भाषेचे अर्थच कळणार नाहीत.सदोष भाषेचे संक्रमण पुढच्या पिढ्यांकडे होईल,ह्यासाठी प्रमाण भाषेचे महत्व अधोरेखित करणे गरजेचे आहे. ह्याच ध्येयाचा मनोमान ध्यास घेणारे एक मराठीचे प्राध्यापक पुण्या मुंबईसारख्या 'मेन स्ट्रीम' मध्ये नाही, परंतु मराठवाड्यातील संभाजीनगर येथील डॉ नागेश अंकुश हे कनिष्ठ महाविद्यालयीन प्राध्यापक स्वतःचे अध्यापनाचे कार्य करत असतानाच मोठे सामाजिक कार्य करत आहेत, ही बाब खूप कौतुकास्पद आणि उल्लेखनीय आहे. गेल्या दोन दशकांपासून ते ह्यात अखंड कार्यरत आहेत. त्यामुळे त्यांची नोंद घेणेही आवश्यक वाटते.

डॉ. नागेश अंकुश हे संभाजीनगर येथील सरस्वती भुवन शिक्षण संचालित कला आणि वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून अध्यापन करतात. त्यांची आजवरची ७ पुस्तके, पूर्णतः 'मराठी सुलेखन,' 'शुद्धलेखन,' 'मराठी लेखनकला' , 'पत्रकारांसाठी शुद्धलेखन' ,'अक्षरमात्र तितुकें नेटके' ह्याआणि अशा विषयांना वाहिलेली आहेत! आकाशवाणी औरंगाबादवरून प्रसारित होणाऱ्या त्यांच्या मुलाखतींमधून जाणवलेल्या काही बाबी अशा. भाषेचे सौंदर्य वाढविण्यासाठी मराठीतील २२ विविध विरामचिन्हांचा वापर लेखकांनी वा विद्यार्थ्यांनी जरूर करावा. अनुस्वार, वेलांटी ह्यांच्या अयोग्य वापरांमुळे अर्थ बदलतात त्याबाबतचे कटाक्ष पाळणे, निर्दोष लेखन करणे हा उत्तम व्यक्तिमत्वाचा भाग होय. ह्यासारख्या सोदाहरण मुद्द्यांवर ते आवर्जून भर देतात. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठी पाठपुरावा करणाऱ्या मराठी प्रेमींनी भाषेचे संवर्धन करतानाच शुध्द मराठी सर्वांपर्यंत कशी पोहोचेल, ह्यासाठी विशेष प्रयत्न करणे अत्यंत गरजेचे आहे.

✍रविबाला काकतकर
मुक्त पत्रकार, समुपदेशक आणि वर्तनशास्त्र प्रशिक्षक (पुणे)
संपर्क ईमेल :
rkakatkar1@gmail.com



मराठीतील तत्सम– तद्भव शब्दांच्या व्युत्पत्ती ,ग्रंथ आणि बोलीभाषेतील फरक, प्रमाण भाषेची अत्यावश्यकता, मराठी व्याकरणाचे नवे जुने–नियम सोप्या भाषेत आणि अनेक उदाहरणांसहित वाचक आणि श्रोत्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी अधिकारी व्यक्तींना प्रशिक्षित करणे हीदेखील आज काळाची खूप मोठी गरज मानायला हवी , तरच मराठी टिकेल ह्यात शंका नाही. इंग्रजी ज्ञानभाषा जगण्यासाठी अत्यावश्यक आहे हे निर्विवाद. परंतु संस्कृत आणि मराठी, आपली मातृभाषा ती नेटकेपणाने अधिकांपर्यंत पोहोचविणे गरजेचे आहे. .

पुण्यासारख्या ठिकाणीदेखील अनेक आणि उत्सुक 'अमराठी' जनतेला मराठी शिकविणारी एकही अधिकृत संस्था किंवा अभ्यासक्रम नाहीत हे मोठे दुर्दैव आहे. मराठी साहित्य परिषद, पुणे विद्यापीठ, मराठी भाषा संवर्धन संस्था ह्यांसारख्यांनी त्यासाठी प्रयत्न केले तरच मराठी आवडीने वाचली जाईल. साहित्यात रस घेऊन लिखाण आणि वाचन करणारे, सर्व वयाचे विद्यार्थी नव्याने घडू शकतील. त्यासाठी अत्यंत तळमळीने आणि आस्थेने हे अविरत कार्य करणाऱ्याडॉ अंकुश नागेश ह्यांच्यासारख्या शिक्षकांची मदत आणि मार्गदर्शन घेणे नक्कीच उपयुक्त ठरेल. आत्ता २१ एप्रिल रोजी लेखकाचे राजहंस प्रकाशनाने प्रसिद्ध केलेले मा गोवा प्रमाण मराठी लेखनाचा इतिहास हे पुस्तक नुकतेच प्रसिद्ध झालेले आहे. प्रमाण लेखनाचा सविस्तर विचार करणारा हा ग्रंथ मराठी साहित्यात विशेष महत्त्वाचा ठरतो.

डॉ नागेश अंकुश यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

# श्रीयश कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगमध्ये 'इग्नाइट हॅकाथॉन' उत्साहात; कोडिंग क्लबचे उद्घाटन

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर – श्रीयश कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी येथे प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या पुढाकारातून आयोजित 'इग्नाइट हॅकाथॉन २०२६' हा तंत्रज्ञान महोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून एकूण ५९ संघांनी सहभाग नोंदवला.

या उपक्रमाचे नियोजन प्रथम वर्षाचे विद्यार्थी समन्वयक आदित्य निकम, गायत्री कुलकर्णी व साक्षी धुळे यांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने केले. या यशस्वी आयोजनासाठी त्यांना प्रा. स्वप्ना बनगे व सह–समन्वयक प्रा. सचिन रगडे यांचे मार्गदर्शन लाभले.

स्पर्धा दोन टप्प्यांत पार पडली. प्रारंभी सर्व सहभागी संघांना प्रकल्प




विकसित करण्यासाठी कालावधी देण्यात आला. त्यानंतर झालेल्या प्राथमिक परीक्षणातून सर्वोत्तम २५ संघांची अंतिम फेरीसाठी निवड करण्यात आली. अंतिम फेरीत तज्ज्ञ परीक्षकांनी प्रकल्पांचे सादरीकरण, तपासणी व मूल्यमापन केले.

अंतिम निकालात 'कॅम्पस केअर' संघाने प्रथम क्रमांक पटकावला. 'अपॅक्स ट्रायो' संघ द्वितीय तर 'ब्रोकन कन्सोल' संघ तृतीय क्रमांकावर राहिला. तसेच 'होरायझन हॅकर्स' व 'ब्रेनबाइट' या संघांना विशेष पारितोषिके प्रदान करण्यात आली.

या कार्यक्रमाचे आणखी एक आकर्षण म्हणजे महाविद्यालयातील 'कोडिंग क्लब'चे उद्घाटन होय. या क्लबचे उद्घाटन बापूसाहेब शिवाजीराव देवरे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, धुळे येथील डॉ. पी. एस. पाटील तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेकनॉलॉजिकल युनिव्हर्सिटी लोणेरे येथील डॉ. जी. एस. वरखडे यांच्या हस्ते करण्यात आले. हा क्लब विद्यार्थ्यांच्या कोडिंग कौशल्यांना वाव देणारे प्रभावी व्यासपीठ ठरणार आहे.

श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. बसवराज मंगरूळे ह्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी कर्नल जॉय डॅनियल, कमांडर प्रदीप सिंग, प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील, अधिष्ठाता डॉ. पी. एम. अर्धापूरकर, विभागप्रमुख संतोष कुलकर्णी तसेच व्यवस्थापन मंडळ यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

या हॅकाथॉनमुळे विद्यार्थ्यांमधील नाविन्यपूर्ण विचार, तांत्रिक कौशल्ये व समस्या सोडवण्याची क्षमता अधोरेखित झाली असून भविष्यातील तंत्रज्ञ घडविण्याच्या दिशेने हे एक प्रेरणादायी पाऊल ठरले आहे.

ज्योतिर्मय

MFO
Mutual Fund Online
Sahi hai.....
म्युच्युअल फंड ऑनलाईन
विनोद शिराळकर 9325383999

🌹 पर्सनल फायनान्स मॅनेजमेंट

पुढे........
आयुष्यातील महत्त्वाचे टप्पे सहजतेने पार करणे, उदाहरणार्थ लग्न, आरोग्य, करिअरमधील बदल मुलांचे शिक्षण,किंवा निवृत्ती साठीची पुंजी यांसारखे महत्त्वाचे टप्पे सहजतेने हाताळण्यासाठी लवचिकता मिळते.

- गुड इएमआय : चांगले कर्ज (जसे की गृहकर्ज, ज्यामुळे मालमत्तेची किंमत वाढते)

आणि

- बॅड इएमआय : वाईट कर्ज (जसे की जास्त व्याजदराचे क्रेडिट कार्ड कर्ज, लाईफ स्टाईलसाठी कर्ज)जे निव्वळ संपत्ती कमी करते, यांमधील फरक ओळखण्यास मदत करते.

सगळ्यात महत्वाचा मुद्दा,पर्सनल फायनान्स मॅनेजमेंट हे अत्यंत वैयक्तिक असते. जी पद्धत एका व्यक्तीसाठी उत्तम काम करते, ती दुसऱ्या व्यक्तीसाठी योग्य असेलच असे नाही, कारण ती पूर्णपणे वैयक्तिक रीस्क टॉलरन्स, आर्थिक उद्दिष्ट्ये, वेळेची मर्यादा आणि जीवन शैलीच्या आवडीनिवडींशी निगडित असते.
तुम्ही तुमच्या साठी पर्सनल फायनान्स मॅनेजमेंट केले आहे का?
तुमच्या पर्सनल फायनान्स मॅनेजमेंट साठी तुम्हाला माहिती आणि सल्ला हवा असल्यास मला कॉल करा.
हा लेख तुम्हाला आवडला असेल तर तुमच्या मित्रांना अवश्य पाठवा.

सांगता येत नाही आणि सहनही होत नाही.....



तुमचे प्रॉब्लेम लपवून ठेवू नका त्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या फोनवर आणि घरीबसून औषधी मिळवा.
■ ऑनलाईन औषधोपचार : आता सर्वकाही झाले आहे ऑनलाईन मग आजारपणात पण घरबसल्या औषधोपचार घ्या, कुठेही जाण्याची गरज नाही, वेळ व पैसा वाचवा 100 % खात्रीशीर इलाज,
गुप्तरोग, शारीरिक थकवा, बऱ्याच गोष्टी कोणालाही सांगण्यास लाज वाटते अशा वेळेस फक्त फोनवर तुम्ही तुमचा आजार सांगू शकता व त्यावर आयुर्वेदिक पद्धतीने हमाखास उपाय केला जाईल, पोस्टाने औषधं पाठविल्या जातील, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. शेख ए एच, 37 वर्षाचा अनुभव, 200 पेक्षा अधिक पुरस्कार प्राप्त, 2 लाखांपेक्षा अधिक विविध लैंगिक समस्यग्रस्त रुग्णांवर यशस्वी उपचार, आतापर्यंत ५ ऑनररी डॉक्टरेटच्या पदव्या देऊन विविध संस्थांनी त्यांना सन्मानित केलेले आहे. त्यांच्या या कार्याची नोंद लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, ओयासिक बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, एशियन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड, हुज-हू-इन एशिया रेकॉर्डस् मध्ये विक्रमी नोंद झालेली आहे.
सेक्स विषयक कोणताही प्रॉब्लेम असो फक्त एकदा फोन करा व मार्गदर्शन घ्या. व तुमचे प्रश्न सोडवा.

Dr Shaikh A H - 98606 99906

## कृतज्ञ मी कृतार्थ मी भगवंत हृदयस्थ आहे

© अपर्णा परांजपे कात्रज पुणे मो.95030 45495



### आत्मज्ञान ...

'ज्ञानाचा अर्थ केवळ माहिती नव्हे, तर आत्म्यामध्ये स्थिर होणे' हा विचार संस्कृत वाङ्मयात अतिशय सुंदरपणे मांडला आहे.

१. ज्ञान म्हणजे काय? (शब्दांचा संग्रह नव्हे, तर आंतरिक स्थिरता)

तुम्ही म्हटल्याप्रमाणे 'केवळ शास्त्र वाचणे म्हणजे ज्ञान नव्हे'. यावर श्रीमद् आद्य शंकराचार्य त्यांच्या 'विवेकचूडामणी' ग्रंथात अत्यंत मार्मिक श्लोक लिहितात:

संस्कृत श्लोक:
शब्दजालं महारण्यं चित्तभ्रमणकारणम् ।
अतः प्रयत्नाज्ज्ञातव्यं तत्त्वज्ञात्तात्त्वमात्मनः ॥
– विवेकचूडामणी (६०)

■ शब्दार्थ : शब्दजालं महारण्यं = शब्दांचे जाळे (केवळ पुस्तकी ज्ञान) हे एका मोठ्या अरण्यासारखे आहे.
चित्तभ्रमणकारणम् = ते चित्ताला (मनाला) अधिक संभ्रमित आणि विचलित करणारे ठरू शकते.
अतः प्रयत्नाज्ज्ञातव्यं = म्हणूनच, प्रयत्नपूर्वक आत्मतत्व जाणून घेतले पाहिजे.

शास्त्रीय विवेचन: शास्त्रे महत्त्वाची आहेतच, पण ती केवळ मार्ग दाखवतात. जर मन केवळ शब्दांच्या आणि वादांच्या जाळ्यात अडकून पडले, तर ते कधीच स्थिर होणार नाही. जेव्हा हे शाब्दिक ज्ञान गळून पडते आणि केवळ 'अनुभूती' उरते, त्यालाच खरे ज्ञान म्हणतात.

२. स्वयं में स्थिर होना (स्थितप्रज्ञता)

'ज्ञान तब है जब मन भटकना छोड़ दे' – या अवस्थेला श्रीमद्भगवद्गीतेत 'स्थितप्रज्ञ' म्हटले आहे. अर्जुन जेव्हा श्रीकृष्णाला विचारतो की स्थितप्रज्ञ माणूस कसा असतो, तेव्हा श्रीकृष्ण उत्तर देतात:

■ संस्कृत श्लोक:
प्रजहाति यदा कामान्सर्वान्पार्थ मनोगतान् ।
आत्मन्येवात्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते ॥
– श्रीमद्भगवद्गीता (२.५५)

■ शब्दार्थ:यदा सर्वान् मनोगतान् कामान् प्रजहाति = जेव्हा मनुष्य मनातील सर्व वासना आणि भटकणारे विचार सोडतो.
आत्मनि एव आत्मना तुष्टः = आणि स्वतःच्या आत्म्यामध्येच स्वतः संतुष्ट (स्थिर) होतो.
तदा स्थितप्रज्ञः उच्यते = त्यालाच 'स्थितप्रज्ञ' (खरा ज्ञानी) म्हटले जाते.

■ शास्त्रीय विवेचन: जोपर्यंत मन बाहेर सुख शोधत भटकत आहे, तोपर्यंत ते अज्ञानी आहे. ज्या क्षणी चेतना बाह्य जगाकडून वळून स्वतःच्या मूळ स्वरूपात (आत्मस्वरूपात) विसावते, तोच खरा आत्मबोध. इथे कोणत्याही बाह्य आधाराची किंवा 'सहारे' शोधण्याची गरज उरत नाही, कारण आत्मा स्वतःच पूर्ण आहे.

३. संसार वैसा ही रहता है... पर अनुभव बदल जाता है

वेदांताचा एक सुवर्ण नियम आहे – "दृष्टी तशी सृष्टी". ज्ञानामुळे भौतिक जग नाहीसे होत नाही, तर त्या जगाकडे पाहण्याचा तुमचा दृष्टिकोन बदलतो. या स्थितीचे वर्णन उपनिषदांमध्ये 'जीवन्मुक्ती' म्हणून केले आहे.

संस्कृत श्लोक:
भिद्यते हृदयग्रन्थिश्छिद्यन्ते सर्वसंशयाः ।
क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन्दृष्टे परावरे ॥
– मुण्डकोपनिषद् (२.२.८)

शास्त्रीय विवेचन: जेव्हा त्या 'परम तत्त्वाचा' (स्वतःचा) बोध होतो, तेव्हा हृदयातील अज्ञानाच्या सर्व गाठी (ग्रंथी) सुटतात आणि सर्व संशय नष्ट होतात. जग पूर्वीसारखेच चालत राहते, पण ज्ञानी पुरुषासाठी त्यातील सुख-दुःखाचा आणि द्वैताचा प्रभाव संपून जातो. संसार तोच राहतो, पण त्याला येणारा 'अनुभव' हा पूर्णपणे शांत आणि अलिप्त असतो.

■ निष्कर्ष : तुमच्या ओळींमधील गाभा हा 'निश्चल तत्त्वाचा' शोध आहे. शास्त्र वाचणे हे 'परोक्ष ज्ञान' आहे. मनाचे भटकणे थांबून स्वरूपात स्थिर होणे हे 'अपरोक्ष ज्ञान' आहे. वेदांताच्या परिभाषेत सांगायचे तर, जेव्हा चेतना वृत्तीरहित होऊन स्वतःमध्येच विरघळते, तिथेच खऱ्या 'शांतीचा' उगम होतो.


■ आत्मबोध : ज्ञान म्हणजे... स्वतःमध्ये स्थिर होणे.
केवळ शास्त्रे वाचणे म्हणजे ज्ञान नव्हे, ज्ञान तेव्हाच प्रकट होते जेव्हा मन भटकणे सोडते आणि चेतना आपल्या मूळ स्वरूपात स्थिर होते.
वेदांत सांगतो... ज्याला आत्मबोध (स्वतःची जाणीव) झाला, त्याला बाहेरून आधाराची गरज उरत नाही. ज्ञान म्हणजे शब्दांचा संग्रह नव्हे, तर ती अंतरात्म्याची स्थिरता आहे. ज्या क्षणी आपण स्वतःमध्ये स्थित होतो, तेव्हा जग तसेच राहते... पण आपला अनुभव बदलून जातो. तिथूनच खऱ्या शांततेचा जन्म होतो, आणि हाच खरा "आत्मबोध" आहे.

## उत्तराखंडमधील एक निसर्गरम्य प्रवास



विश्वास देशपांडे, चाळीसगाव. 94037 49932

भाग - 2



पुढे.......
असेही म्हटले जाते की पांडवांनी आपल्या अज्ञातवासात या मंदिराची स्थापना केली होती. या ठिकाणी भगवान शंकरांसोबत पार्वती, नंदी, गणपती, हनुमान, ब्रह्मा, विष्णू आदींच्या पण मूर्तींचे दर्शन घडते. पण हे दर्शन घेण्यासाठी आपल्याला जवळपास शंभर सव्वाशे पायऱ्या चढण्याची तयारी ठेवावी लागते. पण या पायऱ्या चढून एकदा वर पोहोचलो की आजूबाजूचे दृश्य पाहून मन प्रसन्न होते. श्रम नाहीसे होतात. येथून हिमालयाच्या अन्य शिखरांचे पण दर्शन घडते.
हे दर्शन आटोपून आम्ही पुढील प्रवासाला निघालो. वाटेत एका ठिकाणी थांबून भोजनाचा आस्वाद घेतला. संध्याकाळी कौसानी इथे पोहोचलो. कौसानी हे शांत आणि नितांत सुंदर असे हिल स्टेशन आहे. आपल्याला नैनिताल माहिती असते. पण त्यामानाने कौसानीची माहिती आपल्याला फारशी नसते.
ज्याला शांत निसर्गसौंदर्याचा आनंद घ्यायचा आहे, त्याच्यासाठी हे उत्तम ठिकाण ! हे ठिकाण सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या नयनरम्य देखाव्यासाठी प्रसिद्ध आहे. या ठिकाणी आमचा मुक्काम सुमन रॉयल रिसॉर्ट या हॉटेलमध्ये होता. हे दुमजली हॉटेल आहे. भोवतालचा परिसर निसर्गरम्य आहे हे वेगळे सांगायला नकोच. रूम साध्याच पण स्वच्छ होत्या. सर्व व्यवस्था उत्तम होती. तेथील कर्मचाऱ्यांनी आम्हा सर्वांचे अतिशय प्रेमाने स्वागत केले. स्वागतासाठी फळांपासून बनवलेली दोन तीन प्रकारची सरबते हजर होती. रात्री इथे छान जेवण मिळाले.
आता प्रतीक्षा होती ती सकाळच्या नयनरम्य सूर्योदयाची. सकाळी सूर्योदय पाहण्यासाठी कोणत्या पॉइंटला जावे लागेल अशी चौकशी करता असे समजले की आम्ही हॉटेलच्या ज्या रूममध्ये थांबलो होतो, तिथल्याच मागील बाजूच्या गॅलरीतून आम्हाला सूर्योदय दिसणार होता. सकाळी पाच सव्वापाचलाच उजाडले. आम्ही सुद्धा लवकर उठून पाठीमागच्या गॅलरीत येऊन बसलो. समोर हिमालयाची भव्य शिखरे दिसत होती. मध्ये कोणताही अडथळा नव्हता. साधारण साडेपाचच्या सुमारास उगवतीच्या रंगानी पूर्व दिशा उजळली. डोंगराआडून सूर्यदेव वर येत होते. सगळीकडे सोनेरी प्रभा पसरली होती. समोर हिमालयातील त्रिशूल, नंदादेवी आदी बर्फाच्छादित पर्वतशिखरांचे दर्शन घडत होते. सूर्योदयाचे हे सुंदर दृश्य आम्ही हृदयात साठवून घेतले. क्रमशः........

## उपेक्षित उर्मिला त्याग की मूक प्रतिमूर्ति

लेखिका - डॉ. मीना श्रीवास्तव





आगे....
मिथिला नगरी में ये चारों राजकुमारियाँ यानि, सीता, उर्मिला, मांडवी तथा श्रुतकीर्ति अपने अभिभावकों की निगरानी में क्षात्र धर्म के अनुकूल ज्ञान, राजनीती एवं शस्त्र विद्या में निपुण हो गईं थीं | विधि का विधान ऐसा था कि, सीता के लिए उचित क्षात्रतेज मंडित वीरवर व्यक्ति चुनने के लिए राजा जनक ने प्रण रखा था| जो भी वीर पुरुष उनके पास उनके पूर्वजों से चले आ रहे श्री परशुराम द्वारा धरोहर के रूप में सुरक्षित रखे दिव्य और अति विशाल पिनाक नामक शिवधनुष्य को प्रत्यंचा चढ़ा पायेगा, उसे सीता अपना वर मानेगी| श्रीराम ने यह अत्युच्य पराक्रम दिखाकर सीता का वरण किया| अब विधि का विधान और भी विस्तारित होता नजर आने लगा! महर्षि विश्वामित्र ने राजा जनक को सुझाव दिया कि राम-सीता समेत उर्मिला-लक्ष्मण, मांडवी-भरत एवं श्रुतिकीर्ति-शत्रुघ्न के भी विवाह एक ही विवाह मंडप में संपन्न किये जाएं! लगे हाथों मिथिला नगरी के निकट संकश्य नगरी के शासक कुशध्वज और उनकी पत्नी चंद्रभागा को सन्देश गया| अयोध्या से महाराज दशरथ, भरत एवं शत्रुघ्न और अन्य बारातियों के आते ही एक ही विवाह मंडप में अयोध्या के चारों राजकुमारों का विवाह मिथिला की चार राजकन्याओं के साथ संपन्न हुआ | यहीं समझिये, सीता को छोड़ इन तीनों के विवाह अचानक ही हो गए| यह ब्योहार अति सुलभ था, चार भाई और चार बहनें! जैसे सीता नयी नवेली दुल्हन बनकर अयोध्या के राजपरिवार में आयी, ठीक वैसे ही, उसी के साथ उर्मिला मांडवी तथा श्रुतकीर्ति भी नवपरिणीता वधुएं बनकर अयोध्या आई थीं| इन चारों मिथिला कुमारियों ने अयोध्या के इक्ष्वाकु कुल को धन्य किया | लेकिन भाग्यरेखा की महिमा अपार है| हर कन्या का जीवन अपनी अपनी तरह से अति कठिन| धीरे धीरे विवाह के पश्चात उर्मिला जान गई कि, लक्ष्मण के जीवन की डोर पूरी तरह बंधी है उसके अग्रज राम के साथ, उसके जीवन का हर एक क्षण श्रीराम के चरणों में समर्पित है! जहाँ राम वहाँ सीता तो है, परन्तु उनके पीछे लक्ष्मण छाया बने हैं| परन्तु अब विवाहोपरांत विधि ने तय किया है कि लक्ष्मण की छाया तो उर्मिला है | जो किसी की छाया है उसकी छाया नजर आए तो आए कैसे? राम का वनवास जाना तय होने पर राम के साथ सीता और लक्ष्मण ने भी उनके साथ वन में जाने का निर्णय लिया | क्रमश:......

# अधिक मासाचे खास वाण : नारळाचे शाही धोंडे

ज्योतिर्मय साहित्य

जावई म्हणजे सासूचा लाडका ! कारण तो साक्षात विष्णूचे रूप असतो. मग त्याचे लाड, कौतुक करण्यासाठी नेहमीच सासवा खूपच उत्सुक असतात.

सध्या अधिक मास म्हणजेच पुरुषोत्तम मास सुरु आहे. सर्व सासवांना जावयांना वाण देऊन पुण्य कमवायचे असते. त्यामुळे कोणी ३३ अनारसे, बत्तासे, म्हैसूर पाक किंवा पेढे यांचे वाण देतात. आपण यंदा लाडक्या जावईबापूं साठी खास वाण देऊया. मग लागूया लगेंच तयारीला.



**साहित्य –** २ मोठ्ठ्या नारळाचा चव, २ मोठ्या वाट्या साखर, अर्धी वाटी खवा, २ चमचे खसखस,१ चमचा वेलची पावडर, पाव चमचा जायफळ पूड, पाव वाटी ड्राय फ्रुट्सचे काप, २ वाट्या बारीक रवा,१ वाटी मैदा, मीठ, तळण्यासाठी शक्यतो साजूक तूप, गरज लागली तर लाटताना लावण्यासाठी पाव वाटी तांदूळाची पिठी

**कृती –** प्रथम एका बाऊल मध्ये रवा मैदा घालून त्यामध्ये पाव चमचा मीठ घालावे. २ चमचे साजूक तूप गरम करून ते त्यावर घालावे. पीठ भिजवताना निम्मे दूध व निम्मे पाणी घालून किंवा पाणी घालून कणकेप्रमाणे भिजवावे, रवा थोडा फ ुगतो त्यामुळे त्याचा विचार करून भिजवावे. साधारण अर्धा तास ओल्या कापडाखाली झाकून ठेवावा. म्हणजे छान मुरेल.

आता सारण करण्यासाठी नारळ खोवून घ्यावा. एका कढईत खवा छान भाजून घ्यावा. व खाली काढून घ्यावा. आता कढईत नारळाचा चव घालुन त्यात साखर मिक्स करून ते गॅसवर कढई मध्ये शिजवायला ठेवावे .लहान कढईमध्ये खसखस छान भाजून ती थोडी कुटून घ्यावी. सारणात ती घालून ड्रायफ्रुटसचे काप घालून वेलची व जायफळ यांची पूड घालावी .साखरेचा पाक झाल्यामुळे सुरुवातीला थोडे सैल होईल पण नंतर ते हळू हळू घट्ट होऊ लागेल.ते सारखे परतावे लागते, नाहीतर करपण्याची शक्यता असते. चांगले घट्ट झाले की त्यात खवा घालून पुन्हा सर्व छान मिक्स करून छान खरपूस परतून घ्यावे. आता हे सारण खाली काढून ताटात पसरून थंड करून घ्यावे.

आता पीठ छान मुरले असेल. ते छान मळून शक्य असेल तर खलबत्त्यात थोडे कुटून घ्यावे. म्हणजे पीठ छान एकजीव होऊन त्याला हलकेपणा येईल व पारी लाटायला सोपी जाऊन एकदम सॉफ्ट बनते.




पिठाचे छोटे छोटे गोळे बनवून घ्यावेत. त्याच्या पातळ पुऱ्या लाटून त्यात सारण भरावे व व्यवस्थित बंद करून घ्यावे.असे सारे धोंडे बनवून घ्यावेत.मग कढईत तूप गरम करून त्यात धोंडे सोडावेत व गॅस बारीक करून मंद आचेवर गुलाबी रंगावर खुसखुशीत धोंडे तळून घ्यावेत. लगेंच खायचे असतील तर गरम गरम खावेत नसतील तर ते छान थंड झाल्यावर डब्यात भरून ठेवावेत.

धोंडे थंड सुद्धा खायला छानच लागतात.

**वैशिष्ट्य –** सारणात खवा थोडा भाजून घातल्यामुळे टेस्ट तर बेस्ट येतेचा, पण हेल्दीही बनतात. एक वेगळाच रिचनेस येतो साध्या धोंड्यांनाही, शिवाय अजून टेस्ट सुरेख येते. ड्रायफ्रुट्स मुळे ते अधिक पौष्टिक बनतात. जावयांसाठी खास शाही पद्धतीचे हे धोंडे १०..१२ दिवस छान राहतात.त्यामुळे परगावी वाण घेऊन जायचे असतील तर बिनधास्त नेऊ शकता कारण पुरणाचे धोंडे परगावी नेणे अवघड असते.दरवर्षी अनारशाचे वाण देण्या ऐवजी हे धोंडे वाण हा सुद्धा उत्तम पर्याय आहे.चवीला तर सर्वांना नक्की आवडणारच. हे गोड शाही धोंडे खाऊन जावईबापू नक्कीच खुश होतील. हे धोंडे हेल्दी सुद्धा असल्यामुळे सारेच खुश होतील.सर्वजण मनसोक्त आस्वाद घेऊ शकतात. मग नक्की करा यंदा हे खास शाही धोंडे!

# आणि त्या हरवल्या क्षणी...! (भाग २)

ज्योतिर्मय साहित्य

नुकताच पाऊस पडून गेला होता. आणि सूर्य हळूहळू डोकावत होता. सोसायटीच्या गार्डन एरिया मधील लिंबाच्या झाडाची सावली थोड्या अंतरावर विसावली होती. नदीच्या काठावरील वाऱ्याची मंद झुळुक आली. नि मनीचे गूज कानी संगुनिया गेली. विसवल्या वेळेला निवांत पणाची लाली चढली होती. एवढ्यात त्या फडफडीने तंद्री भंग पावली. आज ही सावली आणि काही दिवसा पूर्वी म्हणण्यापेक्षा वर्षांपूर्वीची ती सावली!

ते दिवस....! कसे निघून जातात ना! अन् गर्दीत हरवलेल्या त्या सावल्यात पाऊले वाट काढत मनाच्या अत्युच्च शिखरावर पोहचतात.

कोऱ्या कागदावर उमटलेली काही अक्षरे जीवनात कधी कधी खूप मोठे बदल घडवून आणतात. मनाच्या त्या चलबिचल अवस्थेला अन् फडफड नाऱ्या त्या पानांवर हात ठेवून बॉक्समधील लेखणी कडे हात वळले.आणि...!



ते दिवस आजही आठव तात, खिडकीत असलेल्या त्या काळया कव्हरच्या आतून येणारा आवाजाने दिवस सुरू व्हायचा. घड्याळातला टन टन करत तो लोलक ठोके वाजवून गायब व्हायचा. अन् सव्वा सहाला भक्ती संगीताने डोळ्यांच्या पापण्यांना खिडकीतल्या प्रकाशाचे दर्शन व्हायचे. सहा पन्नास ला चिंतन सहा पंचावन्न ला ए.. एम.. आकाशवाणी केंद्र हः बलादेवांनद सागराहा.. इती वर्तः, सात वाजता इंग्लिश न्युज, आणि सात पाचला मराठी बातमी पत्र, सव्वा सातला चित्रपट संगीत , छायागीत, नऊ वाजून दहा मिनिटांनी लागणारा शैक्षणिक कार्यक्रम, साडे नऊ ला लागणारी बालगीते. रविवारी सायंकाळी सव्वा सातला लागणारे किर्तन म्हणजे सकारात्मकतेचा खजिना वाटायचा. इतर दिवशी सव्वा सातला लागणारे लोक संगीतातील आत्ता तुम्हीच सांगा पाव्हण कुठं जातील काळया पोरी कोपऱ्यात बसणार, बायकोचं ऐकणार,भुईला भार नसावा.ही लोकगीते आजही ओठांवर येऊन रमतात. आणि गुणगुणत माणसाला डुला यला नाही लावले तर नवलच. इकडे तिकडे जेवण आभ्यास होते न होते तोच रात्री





साडे नऊ वाजता रात्रीच्या त्या रातकिड्यांचा तो आवाज आणि त्या आवाजात मंतरलेले ते नभोनाट्यातले संगीत अंथरुणात ही घुमायचे. नभोनाट्य संपता संपता रात्री दहा वाजता आपली आवड ऐकता ऐकता आणि जीवनाचा एक अविभाज्य घटक असलेल्या त्या घटकाचे मिटलेल्या डोळ्यांना अन् कानाना वेध लागायचे ते पुन्हा दुसऱ्या दिवशीच्या भक्ती संगीताचे या अन् अशा कितीतरी कार्यक्रमाचे आस्वाद घेत जीवन कोणत्या वळणावर जाऊन कुठे पोहचते. आणि काळाच्या त्या वेगात कुठे हरवते, याची जाणीव तेंव्हा झाली नाही.

ऊन, वारा, पाऊस,
पाऊलवाटा तुडवित
हि वाट दूरात धावते.
विविधतेने मग ज्ञानाच्या
कक्षा रुंदावत जाते.

कळत नकळत परवा सहजच तिकडे पाऊले वळली. उंच गेटच्या बाजूने आत गेले. समोर दिसणारी टवटवीत फ ुले, हिरवी गार झाडे, स्वच्छ सुंदर परीसर आणि त्यात शोभणारे ते आकाशवाणी सातारा.. टक टक करत दोन तीन पायऱ्या चढून वर गेले. समोरच्या हॉल मधील शांत आणि प्रसन्न वातावरण आणि त्यामध्ये अगदी शांत मधूर नि प्रसन्न वातावरणात चालू असलेले ते गाणे मनाला सुखावून गेले.

समोरच्या दारातून आत गेले. सुरांच्या दालनात विण्याच्या तारा छेडाव्या आणि शेजारीच असलेल्या सुंदर मोत्याच्या मालेतील मनी विखरून होणारा आवाज कानी पडावा असेच झाले काहीसे. काहीऔपचारिक क्षणांनंतर ..समोर बसलेल्या व्यक्तिमत्व म्हणजे उगाच स्तुस्ती सुमने म्हणून आजिबात नाही. पण एकूणच बोलण्या बोलण्यातून एक जवळीक जिव्हारी भिडली. **(क्रमशः)**


## कवितेच्या लाटावर...











## कवितेच्या लाटावर...







हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी–चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

# माणसा जाण अमुल्य जन्म माणसाचा

ज्योतिर्मय साहित्य

माणसाचं जीवन, त्याचा स्वभाव, त्याचं वागणं बोलणं अगम्य आहे. कोणता माणूस कधी कसा वागेल सांगता येत नाही. काही माणसं काही क्षणाक्षणाला आपले चेह-यावरचे रंग बदलतात, मध्येच हसतात, मध्येच रुसतात, मध्येच बोलतात, लगेच रागावतात. मध्येच लाडीगोडी लावतात. अशा माणसांची किती रुपं तरी सांगायची! माणसा रंग तुझे हजार! काही माणसं पोटात एक आणि ओठात एक असं वागतात. माणसाच्या क्षणक्षणाला बदलणा-या स्वभावाचं गुपीत तुम्हाला म्हणून सांगतो. माणूस आपल्या चेह-याच्या आणि हातापायांच्या हावभावाने सा-या जगाला फसवू शकतो. पण, माणसाचे डोळे मात्र, त्याचं खरं रुप प्रकट करतात. या डोळ्यांमुळेच माणसाच्या अंतरंगात

काय आहे याचा अंदाज घेता येऊ शकतो. यात महत्वाची गोष्ट म्हणजे माणसाने नाट्यकला व अभिनय सादर करताना आपल्या चेहऱ्यावरचे रंग बदलणे, आवाज बदलणे योग्य आहे.
कारण,

तो माणूस त्याची कला सादर करीत असतो.

पण, त्याच्या स्वार्थापोटी त्याने या कलेचा उपयोग करु नये. कारण, त्यांच्या अभिनयाला भुलून बरेच भोळेभाबडे लोक बळी पडतात.

त्यामुळे, त्यांचं बरच नुकसान होऊ शकतं.
जेव्हा

ब्रह्मदेवाने सृष्टीची निर्मिती केली तेव्हा, इतर प्राण्यांबरोबरच माणसाचीही निर्मिती केली.

माणसाला मानवप्राणी अशी संज्ञा आहे.
कारण,


समाजशास्त्रात माणसाला समाजशील प्राणी म्हटले जाते. सध्याच्या या युगात मात्र प्राणी माणसासारखे वागत आहेत.पण, बव्हंशी माणसं मात्र प्राण्यांसारखे वागत आहेत. याला माणूस ऐसे नांव! माणसा! रंग तुझे हजार!

ब्रह्मदेवाने जेव्हा सृष्टीची निर्मिती केली. तेव्हा, त्याने निसर्ग, पशु,पक्षी, प्राणी जलातले व जलाबाहेरचे चराचर सृष्टीतले अगदी सुक्ष्म तसेच, बलाढ्य महाकाय असे प्राणी निर्माण केले. पण, भगवंताला तरीही त्याने समाधान झाले नाही. म्हणून, भगवंताने मग माणसांची निर्मिती केली. इतर पशू,पक्षी व प्राण्यांना जीवन दिले व जीवन जगण्यापूरती माफक बुध्दी दिली. पण, ब्रह्मदेवाने माणसाला मात्र,

व्यापक, अफाट बुद्धिमत्ता दिली. तसेच, जीवन सुखकर व आनंदी होण्यासाठी हास्याचे वरदान दिले. त्यामुळे, माणसाने स्वतःच्या बुध्दीच्या आधारे या जगात खूप खूप प्रगती केली. नवनवीन शोध लावले. त्याआधारे नवीन प्रकारची अनेक तांत्रिक व यांत्रिक अशा साधनांची निर्मिती केली. त्यामुळे, विज्ञानाच्या बुध्दीच्या आधारावर अनेक तंत्रज्ञानयुक्त, तसेच, संगणकीय ज्ञानाच्या आधारे अत्याधुनिक संगणकीय तंत्रप्रणाली विकसित केली. त्यामुळे, माणसांचे जीवन सुखकर व आनंदी झाले. हे खरे आहे. परंतु, कोणत्या गोष्टींचा किती लाभ घ्यायचा! आणि त्यांचा मोह सोडून द्यायचा हे प्रत्येक माणसाने मनाने ठरविले पाहिजे. तसेच,



त्यानुसार आचरण केले पाहिजे. नुसते अगणित कोट्यावधी, अब्जावधी रुपये कमविणे म्हणजे जीवन नाही. माणसाचे जीवन हे सुखासमाधानाने, आनंदाने जगण्यात व दूस-यांनाही आनंद देण्यात व जगविण्यात आहे. यातच, माणसाच्या जीवनाची सार्थकता आहे. पण, बरीचशी माणसं या गोष्टींकडे दूर्लक्ष करतात. त्यांना अमाप पैसा आणि ऐशोआराम हवा असतो. परंतु, आयुष्याच्या शेवटी मात्र त्यांना त्यांची चूक समजून येऊ लागते. पण, तेव्हा मात्र खूप उशीर झालेला असतो. म्हणून,




माणसाने वेळीच ह्या गोष्टी लक्षात घेवून आपली जीवनशैली सुधारली पाहिजे. परंतु, बरीचशी माणसे अशीही असतात की, ज्यांना

त्यांच्या वयाच्या शेवटच्या टप्प्यावरही म्हणजे अगदी ऐशी,नव्वद व पंचाणवव्या वर्षीही सत्तेचा आणि पैशांचा, धनाचा मोह सुटत नाही.

या अशा जीवनाला काय अर्थ आहे. भगवंताने माणसाला माणसाचे जीवन दिले ते मनुष्यजन्माचे सार्थक करुन घेण्यासाठी दिले आहे. पण, माणूस मात्र काय करतो आहे. नुसते पैसे पैसेच करतो आहे. पैशांचा भस्म्यारोग लक्ष लागला आहे बव्हंशी माणसांना पैशांशिवाय दूसरं काही दिसतंच नाही त्यांना

अहो! जगद्गुरु थोर संत श्री तुकाराम महाराज यांनी श्रीविठ्ठल देवाला, विठूमाऊलीला भक्तीयुक्त अंत:करणातून हाक मारीत ते म्हणतात

''जेथे जातो तेथे तू माझा सांगाती।

चालविसी हाती धरोनिया। ''इतकी उत्कट भक्ती आणि इतका उत्कट भाव भक्त आणि भगवंताचा आहे. हे खरे जीवन! ही खरी भक्ती!

त्यानेंच मिळते खरी मुक्ती! पण, तुकाराम महाराज म्हणतात, नको आम्हा मोक्ष!नको आम्हा मुक्ती! विठूराया! तुझ्याच चरणी सदैव लाभो आम्हा सत्संग युगोयुगी! पण, सध्याच्या या एकविसाव्या शतकातील तिसऱ्या दशकातील पैशांच्या अतिलालसेंने मोहग्रस्त, पैसेग्रस्त झालेले माणसे काय म्हणतात पाहा!हीच त्यांची भावना आहे.

''जेथे जातो तेथे पैशा तू माझा सोबती।

सारे जीवन आहे माझे तुझ्याचसाठी। '' आता काय म्हणावे अशा माणसांना! पैसा हे साधन आहे,साध्य नाही! धर्म!अर्थ!काम! व मोक्ष या मानवी जीवनाच्या चार पाय-या आहेत. चार प्रमुख तत्वे आहेत. त्याचं माणसाच्या जीवनात खूप विशेष असं महत्त्व आहे. पण, आजची बव्हंशी माणसं काय करीत आहेत! तर या चारपैकी फक्त अर्थालांचमहत्व देत आहेत. फक्त त्याचंच पालन करीत आहेत. स्वतःच्या जीवनाचं सोनं करण्याऐवजी स्वतःच्या अमुल्य अशा जीवनाची माती करीत आहेत. म्हणून भगवान श्रीकृष्णांनी भगवद्गीतेमध्ये सांगितलेलेच आहे की, ''जसे कर्म तसे फळ''।

म्हणूनंच, प्रत्येक शतकात थोर संत व संतपुरुषांच्या माध्यमातून भगवंत माणसाला सत्कर्म करण्याचे सन्मार्गाने संसार आणि परमार्थ करण्याचे सांगतात. त्यांच्या जीवनभर ते हेच सत्कार्य करीत राहतात. ''श्री स्वामी समर्थ ''

''कृपा ईश्वराची ''
निज जीवनी सदैव सजवून ठेवा
मखमली चादर निज आयुष्याची
ही अमृतभेट आहे हे घ्या ध्यानी
तुम्हाला मिळालेली या धरेवरी
अमुल्यभेट भगवंताची!''मनुष्यजन्माची''!
इथे न आहे जगती कोणी
कायमचा असे रहिवासी
प्रत्येकाचा हा मार्ग वेगळा
तैसाचि कर्मांचा हिशोब वेगळा
या जगाचा खेळ असे आगळा
कळला आहे ज्याला ज्याला
तोच सुखानदाने जगतो इथे
फक्त सत्तामत्ता आवडे ज्याला
जीवनानंद कधी न मिळे त्याला
जगण्यासाठी जगी जन्म मिळाला
पण ज्यांना जगणे कळले नाही
माणूस म्हणून जगती जन्मूनही
व्यर्थचि तो धरेला भार झाला
माणूस म्हणून जगी जन्माला येणे
असे संचित,असे पुण्य सत्कर्मांचे
संत सज्जनांचा सहवास लाभणे
हे तो आहे ईश्वराची कृपा लाभणे

# माझी माय आक्का : एका कृतज्ञ आत्म्याचा भावस्पर्शी प्रवास

ज्योतिर्मय साहित्य

माझी माय आक्का हे केवळ एका शिक्षकाचे आत्मवृत्त नाही, तर प्रतिकूलतेवर मात करुन यशाचे शिखर सर करणाऱ्या एका संपूर्ण पिढीचा प्रातिनिधिक दस्तऐवज आहे. निसर्गाचा लहरीपणा, गरिबी, कौटुंबिक आपत्ती आणि भूकंपासारखी नैसर्गिक संकटे या सगळ्यांमधून तावूनसुलाखून निघालेल्या एका संवेदनशील आत्म्याचा (आत्माराम) हा विलोभनीय प्रवास आहे. या लेखनाला ज्येष्ठ साहित्यिक विठ्ठल वाघ यांची लाभलेली प्रस्तावना या पुस्तकाचे वाङ्मयीन वजन अधिक वाढवते.




मुख्य कथानक आणि विषयसूत्र

कथानकाची सुरुवात सातारा जिल्ह्यातील कोयना नदीच्या काठावर वसलेल्या सुपने या निसर्गरम्य आणि पौराणिक पार्श्वभूमी असलेल्या गावापासून होते. अवघ्या सहा महिन्यांचे असताना आईचे छत्र हरवलेल्या आत्मा नावाच्या बालकाला त्याची मावशी रकू आक्का पोटच्या गोळ्यासारखं सांभाळते. पुढे तीच त्याची सावत्र आई होते.

लेखकाचे बालपण, उजव्या हातावरून बैलगाडीचे चाक गेल्याचा अपघात, शिक्षणासाठी केलेला संघर्ष, मुंबईतील माथाडी कामगारांचे अनुभवलेले कष्टप्रद जीवन, आणि अखेर डी. एड., बी.ए., एम.ए. करत पुणे महानगरपालिकेत आदर्श शिक्षक व मुख्याध्यापक म्हणून मिळवलेली प्रतिष्ठा... असा हा थक्क करणारा प्रवास या आत्मकथनातून उलगडत जातो.

पुस्तकाची बलस्थाने व वैशिष्ट्ये

वात्सल्याची त्रिमूर्ती : माय आक्का आणि आबा पुस्तकाचा केंद्रबिंदू आक्का (रुक्मिणी) आहे. ''माय मरो मावशी उरो'' या म्हणीला आक्काने आपल्या अपार मायेने खरे करून दाखवले. स्वतः अशिक्षित असूनही ''मी मास्तर,




इंजिनिअर, डॉक्टराची आई आहे'' हा तिचा स्वाभिमान आणि तिची जिद्द वाचकाला हेलावून टाकते. आबांचे शांत, प्राणिमात्र प्रिय व्यक्तिमत्त्व आणि त्यांनी विमानाचे स्वप्न पाहण्याऐवजी ''विमानात बसण्याचे स्वप्न बघ'' असा दिलेला जीवनाचा कानमंत्र पुस्तकाला वेगळी उंची देतो.

ग्रामीण संस्कृतीचे हुबेहूब चित्रण

लेखकाने ७०-८० च्या दशकातील ग्रामीण संस्कृती जिवंत केली आहे. जात्यावरच्या ओव्या, गुऱ्हाळातील उकळणारा रस, विहिरीवर पोहण्याच्या गमती, सुगीचे दिवस, बैल गणप्या आणि कुत्रा नगऱ्या यांच्याशी असलेले माणसासारखे नाते, तसेच गावातील जत्रा, तमाशा, आणि भूकंपानंतरचे पुनर्वसन यांचे अत्यंत प्रामाणिक चित्र डोळ्यांसमोर उभे राहते.

श्यामची आई या संस्काराची सावली

लेखकाच्या जीवनावर साने गुरुजींच्या श्यामची आई या पुस्तकाचा असलेला प्रभाव संपूर्ण लेखनात जाणवतो. पहिल्या पगारातून पुस्तक विकत घेणे आणि आपल्या आक्कात श्यामची आई पाहणे, हा प्रसंग वाचकाच्या डोळ्यात पाणी आणल्याशिवाय राहत नाही.

गुरुवर्यांप्रती कृतज्ञता

डी. आर. पवार गुरुजी, संदे गुरुजी, डांगेसर (ज्यांनी इंग्रजीची गोडी लावली), प्राचार्य नानासाहेब माने या सर्व शिक्षकांबद्दल लेखकाने व्यक्त केलेली कृतज्ञता आजच्या काळात दुर्मिळ आणि मार्गदर्शक आहे.

भाषाशैली आणि सादरीकरण

लेखकाची भाषा अत्यंत साधी, सरळ, प्रवाही आणि प्रामाणिक आहे. कुठेही भाषेचा बडेजाव नाही की कृत्रिमता नाही. सातारी/ग्रामीण बोलीतील संवादांमुळे (उदा. ''माझ्या आत्माला चांगलं शिकवा, त्याला आय नायं...'') कथनाला मातीचा सुवास येतो. पुस्तक वाचकाची उत्सुकता शेवट पर्यंत टिकवून ठेवते. शेवटी आक्काच्या निधनानंतर झालेला पसायदानाचा आणि हरिपाठाचा दृष्टांत मनाला चटका लावून जातो.

माझी माय आक्का हे केवळ एका व्यक्तीचे चरित्र नसून तो कृतज्ञतेचा महामंत्र आहे. आई-वडिलांचे अपार कष्ट आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे एक सामान्य ग्रामीण मुलगा कसा घडतो, याचे हे जिवंत उदाहरण आहे. आजच्या भौतिकवादी आणि विभक्त कुटुंबपद्धतीच्या काळात, एकत्र कुटुंबपद्धतीचे महत्त्व आणि आई-वडिलांचे ऋण काय असतात, हे सांगणारे हे पुस्तक प्रत्येक कुटुंबाने आणि विशेषतः नवीन पिढीने वाचलेच पाहिजे.

थोडक्यात सांगायचे तर... हे आत्मकथन वाचताना मन भूतकाळात रमते, डोळे पाणावतात आणि शेवटी एका आदर्शाची शिदोरी हाती लागते! एक उत्कृष्ट, हृदयस्पर्शी आणि संग्राह्य साहित्यकृती.

लेखक: आत्माराम जाधव

प्रकार: आत्मकथन

पार्श्वभूमी: सुपने, पाटीलवाडी (जि. सातारा) आणि पुणे. प्रकाशन - संवेदना प्रकाशन, चिंचवड.

# गंगा दशहरा

ज्योतिर्मय साहित्य

दशहरा म्हणजे दहापापे हरण करणारी. गंगा नदीच्या काठी या दहा दिवसांत जो उत्सव साजरा करतात, त्याला दशहरा असे म्हणतात.

दशहरा म्हणजे गंगोत्सव.

दशहरा हे गंगानदीचे नांव आहे. ज्येष्ठ शुद्ध प्रतिपदेपासून ज्येष्ठ शुद्ध दशमी पर्यंत गंगेचे पूजन, अर्चन, गंगास्तूति वाचन, गंगा स्तोत्र पठण, गंगा स्नान, जलपान, गंगावतरणाच्या इतिहासाचे वाचन या पैकी शक्य असेल ते करुन दशहरा उत्सव साजरा करतात.

जेष्ठ शुद्ध प्रतिपदा ते जेष्ठ शुद्ध दशमीपर्यंत शंकराच्या देवळांतून हा उत्सव साजरा केला जातो.

अनेक ठिकाणी शंकराच्या देवळांतून लघुरुद्र केलें जातात व अभिषेक केलें जातात. अभिषेक हे प्रतिक आहे.

अभिषेक पत्रातून पाण्याची धार जशी सतत परमेश्वरावर पडत असते, तसे आपले मन सतत परमेश्वरचरणी असले पाहिजे.

रुद्र हे शंकराचे एक स्तोत्र आहे. ते अकरा वेळा म्हटले की एक एकदष्णी होते. अकरा एकदष्णीचा एक लघुरुद्र. अकरा लघुरुद्रांचा एक महारुद्र आणि अकरा महारुद्र केलें की एक अतिरुद्र होतो. अशा प्रकारे अभिषेक करणे ही अभिषेक भक्तीची , उपासनेची एक पद्धत आहे.

त्या उत्सवाचा ज्येष्ठ शुद्ध प्रतिपदेपासून प्रारंभ! ज्येष्ठ शुद्ध दशमीला त्याची समाप्ती होते. त्यालाच 'गंगादशहरा' असे म्हणतात.

गंगा ही केवळ एक नदी नाही, तर हिंदुस्थानचा इतिहास, भूगोल, साहित्य संस्कृती या सर्वांचा गतीप्रवाह गंगेच्या प्रवाहाशी जणू एकरूप झाला आहे. आपल्या संस्कृतीचे खास वैभव असे, की आपण नेहमीच निसर्गाशी जास्तीत जास्त समरस होण्याचा प्रयत्न करीत आलो आहोत. इथला निसर्ग, इथले पाऊसपाणी आणि इथली एकुण परिस्थिती नेहमीच्या जगण्या-वागण्यात प्रतिबिंबीत व्हावी, अशा पद्धतीने आपल्या सणावारांची रचना केली आहे आणि ही रचना हजारो वर्षे अबाधितपणे आचरणात आणली जात आहे.

नदी ही नेहमी वाहती म्हणून पवित्र, त्यात गंगा ही जास्तच पवित्र. अगदी शपथ घ्यायची झाली तरी 'गंगा की सौगंध' म्हणून घेतली जाते.

परमपूज्य शंकराचार्य, ज्ञानेश्वर माऊली, महाकवी कालिदास आणि अनेक कवींनी गंगेवर सुंदर काव्यरचना केली आहे. ही गंगा भूतलावर जेंव्हा अवतीर्ण झाली, तो दिवस म्हणजे ज्येष्ठ शुद्ध दशमीचा!

त्या उत्सवाचा ज्येष्ठ शुद्ध प्रतिपदेपासून प्रारंभ! ज्येष्ठ शुद्ध दशमीला त्याची समाप्ती होते.



त्यालाच 'गंगादशहरा' असे म्हणतात.

ईश्वाकू कुळातील राजा भगीरथ याने आपल्या पूर्वजांना परलोकी गती मिळावी, म्हणून भगवान शंकराची आराधना करून ही नदी पृथ्वीवर आणली, अशी कथा आहे. त्यासाठी त्याने प्रयत्नांची शिकस्त केली व यश मिळवले. म्हणून आजही एखाद्या कार्यसिद्धीसाठी घेतलेल्या कष्टाला, प्रयत्नाला भगीरथ प्रयत्न' असे म्हणतात.

गंगा ही हिमालयाची कन्या, ती सागराला मिळते. गंगा ही फक्त शिवमंगलाच नव्हे, तर ज्ञानाची आणि परमसौंदर्याची साक्षात मुर्ती आहे, म्हणूनच महेश्वर तिला मस्तकी धारण करतात. सर्वांना जल स्वरूपात जीवनदान देणारी माता, सर्वांचे मनोरथही पूर्ण करते. ती पापनाशिनी आहे. म्हणून आपण आंघोळ करताना 'गंगेचे श्लोक' म्हणतो. जणू गंगेचा स्पर्शच आपल्याला त्या श्लोकाद्वारे होतो. गंगेच्या पाण्यात काही प्रभावी




औषधी गुणधर्म असल्याचेही सांगतात. आजही तांब्याच्या बंदिस्त कलशात भरलेली गंगा अगदी जशीच्या तशी शुद्ध व ताजी वाटते.

गंगा माता म्हणून पूजनीय असलेली पवित्र गंगा नदी, ही केवळ एक नदी नसून, पापांचे क्षालन करणारी आणि मोक्ष देणारी एक आध्यात्मिक शक्ती आहे. तिच्या स्वर्गातून पृथ्वीवर अवतरणाची आख्यायिका राजा भगीरथाच्या अढळ निश्चयाशी खोलवर जोडलेली आहे.

राजा सगराच्या पुत्रांचा शाप

भगीरथाच्या काळाच्या खूप आधी, सगर नावाच्या एका शक्तिशाली राजाने आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी अश्वमेध यज्ञ केला होता . परंतु, सगराचा वाढता प्रभाव पाहून इंद्रदेवाने यज्ञाचा घोडा चोरून कपिल ऋषींच्या आश्रमात लपवला.

राजा भगीरथ आणि पवित्र गंगेचे पृथ्वीवर अवतरण

सगराचे ६०,००० पुत्र घोड्याच्या शोधात निघाले आणि अखेरीस महर्षी कपिलांच्या आश्रमात पोहोचले. महर्षींना चोर समजून, त्यांनी त्यांच्यावर घोडा चोरल्याचा आरोप केला. त्यांच्या या गर्वाने संतप्त झालेल्या महर्षी कपिलांनी आपल्या दिव्य दृष्टीने त्यांना जाळून राख केले आणि जोपर्यंत त्यांचे आत्मे गंगेच्या पवित्र पाण्याने शुद्ध होत नाहीत, तोपर्यंत त्यांना अतृप्त राहण्याचा शाप दिला.

राजा भगीरथची थोर तपस्या

इक्ष्वाकू वंशातील राजा सगर यांचा पुत्र अंशुमान आणि अंशुमानाचा पुत्र दिलीप या दोघांनीही गंगेला पृथ्वीवर आणण्यासाठी कठोर तपश्चर्या केली, परंतु त्यांना यश आले नाही. महाराज भगीरथ हे दिलीप यांचे पुत्र होते. त्यांनी आपल्या पूर्वजांच्या मुक्तीसाठी गंगेला पृथ्वीवर आणण्याचा निश्चय केला.

यासाठी त्याने एक हजार वर्षे तीव्र तपश्चर्या केली..भगीरथाने आपले राज्य सोडून हिमालयात जाऊन गंगेची तपश्चर्या केली. त्यांच्या तपश्चर्येने प्रसन्न होऊन गंगा प्रकट झाली,

परंतु तिने सांगितले की, ''मी जेव्हा स्वर्गातून खाली येईल, तेव्हा माझा वेग इतका प्रचंड असेल की पृथ्वी तो पेलू शकणार नाही. माझा वेग सांभाळण्यासाठी भगवान शिवाला प्रसन्न करावे लागेल''.

शिव आणि गंगा अवतरण:

भगीरथाने भगवान शिवाची आराधना केली. शिवाने प्रसन्न होऊन गंगेचा वेग आपल्या जटांमध्ये झेलण्याचे मान्य केले. जेव्हा गंगा स्वर्गातून पृथ्वीवर आली, तेव्हा भगवान शिवाने तिला आपल्या जटांत धारण केले, ज्यामुळे तिची प्रचंड शक्ती नियंत्रित झाली. त्यानंतर गंगा शिवाची जटांमधून सात प्रवाहात पृथ्वीवर अवतरली. ही महत्त्वपूर्ण घटना गंगा दशहरा म्हणून साजरी केली जाते.

राजा भागीरथ आणि पवित्र गंगेचे पृथ्वीवर अवतरण

गंगा भगीरथाच्या मागे जात असताना, तिच्या संपर्कात आलेल्या सर्वांची पापे धुऊन टाकत अखेरीस त्या ठिकाणी पोहोचली, जिथे राजा सगराच्या पुत्रांची राख होती . त्या पवित्र पाण्याला स्पर्श करताच सगराच्या पुत्रांच्या आत्म्यांना मोक्ष (मुक्ती) प्राप्त झाला .

गंगेचे शाश्वत महत्त्व

गंगेच्या अवतरणाची कथा ही भक्ती, चिकाटी आणि दैवी कृपेच्या विजयाचे प्रतीक आहे. आजही गंगा नदीला हिंदू धर्मातील सर्वात पवित्र नदी मानले जाते , जी आत्म्यांना शुद्ध करते आणि आध्यात्मिक मुक्ती देते असा विश्वास आहे. हरिद्वार, वाराणसी आणि प्रयागराज यांसारख्या ठिकाणी भाविक पवित्र विधी करण्यासाठी तिच्या काठावर गर्दी करतात.

राजा भगीरथाच्या दृढनिश्चयाने आणि निःस्वार्थ वृत्तीने गंगा पृथ्वीवर आणली, ज्यामुळे त्याच्या पूर्वजांची आणि असंख्य भक्तांची मुक्ती निश्चित झाली. त्याची कथा आपल्याला आठवण करून देते की श्रद्धा, भक्ती आणि चिकाटी कशी आकाशालाही हलवू शकते . गंगा दैवी आशीर्वाद आणि भगीरथाच्या महान तपश्चर्येचा वारसा घेऊन अविरत वाहत आहे.

भगीरथामागोमाग जाऊन सगरपुत्रांचा उद्धार केला. भगीरथाने तिला पृथ्वीवर आणले, म्हणून ती भगीरथाची कन्या म्हणजेच भागीरथी बनली.. (भागवतपुराण नवमस्कंध, ब्रह्मांड पुराण ९७). भगीरथाच्या कठोर तपश्वर्येवरुनच 'भगीरथ-प्रयत्न' असा वाक् प्रयोग रुढ झाला आणि भगीरथ हा कठोर प्रयत्नवादाचे प्रतीक बनला.

# बहुरुपी

सकाळची दहाएक वाजण्याची वेळ होती. आज तालुक्याचा बाजार दिवस होता. तालुका चांगला ऐसपैस पसरला होता. सराफ कट्ट्यावरची दुकानं पण उघडली होती अन् गर्दीने फुलली होती. अशाच एका ब-यापैकी चालणाऱ्या एका सराफाच्या दुकानात गर्दीतून वाट काढत एक गोरा गोमटा,उंचापूरा,मध्यम बांध्याचा,उंची वस्त्र, बूट,टाय लावलेला एक अधिकारी आत आला.

आल्या आल्या दुकानदार सराफाला म्हणाला,अहो मालक जरा दिल्या घेतल्याची,जमा रक्कमेच्या पावत्या दाखवा ओ.सगळे सोन्याचे दागिने हॉलमार्क आहेत ना हे ही दाखवा.का बरं दाखवू?अहो मालक मी इन्कमटॅक्स ऑफिसर आहे. माझे आणखीन सहकारी येत आहेत. ते येई पर्यंत सगळ्या वह्या व पावत्या काढून ठेवा. हे हातातले गिर्हाईके झाल्यावर थोडावेळ कुणाला आतबाहेर करु देऊ नका.

एवढ्या बोलण्याने सराफाच्या तोंडचे पाणीच पळाले.साहेब,साहेब अहो असं कसं अचानक!! मालक आम्ही अचानकच येत असतो. अचानक आल्यावरच काही तरी नको ते हाती लागतं.शासन तुम्हाला वारंवार सांगते दागिने हॉलमार्क करा,चोरीचे सोने घेऊ नका,पक्क्या पावत्या ठेवा,एवढ सांगूनही तुम्ही ऐकत नाहीत म्हणून असं अचानक धाड टाकावी लागते.बरं जरा फोन द्या बरं.हं साहेब गाड्या घेऊन या. आता सराफाची तत पप व्हायला



लागली. साहेब आलेत ही बातमी दुकाना बाहेर पडली,तशी सगळ्या जवळपासच्या सराफांनी घाबरून दुकाने बंद केली आणि निघून गेले.

थोड्या वेळाने अरे साल्या काही तरी थंड मागव.असं सराफाला साहेब म्हणाले. तू जिल्हा परिषदेच्या पाठखळवाडी शाळेत शिकायला होता ना?हो साहेब तुम्हाला कसं माहिती साल्या विसरलास काय?फडक्यात आणलेल्या भाजी भाकरी मधल्या सुट्टीत खाल्लेल्या विसरला काय?दहिहंडी वरुन पाडलेलं,पाटलाच्या वहिरीत पोहलेलो विसरला वाटतं....!!

एवढे दाखले दिल्यावर एकदम सराफ म्हणाला दिलीप का रे?एकदम साहेबांनी जवळ ओढून घट्ट मिठी मारली. अरे काय लगा राम्या ओळखल नाही होय.लगा हुबेहूब साहेब दिसतोय कसा ओळखणार?लगा सगळे सराफ दुकानं बंद करून गेली की.....!!

अरे आपल्या देशमुख गुरुजींनी एकदा बहुरूपी धडा शिकवताना वाटलं होतं आपण पण बहुरुपी व्हावं.पण आईबापांच्या मुळे आधी नोकरी केली आणि पंचवीस वर्षे सेवा करून राजीनामा देऊन टाकला. आणि एके दिवशी हा आवडता उद्योग सुरु केला.पण हा बहुरूपी कला सादर करण्यासाठी मी जिल्हाधिकारी यांची रितसर परवानगी घेतली आहे. त्याशिवाय असं सोंग घेता येत नाही. मला काही कमी नाही. या कलेच्या माध्यमातून जमलेली रक्कम मी अनाथ मुलांना,आणि वृध्दाश्रमांना देणगी खातर देऊन टाकतो.

चल तू पण मोठी रक्कम या माझ्या वही मध्ये लिहून. बाकीच्या फसलेल्या सराफांना पण या वहीत रक्कम लिहून द्यायला सांग.अधिकारी नसून सोंग घेतलेला बहुरूपी आहे. हे समजल्यावर बर्याच जणांनी दुकाने उघडली होती.

तुला माहित आहे. देशमुख गुरुजींनी तो बहुरूपी धडा शिकवताना सांगितले होते, बहुरूपी फक्त सोंग हुबेहूब वटवतो.पण तो कधी कुणाला फसवत नाही. कुणाचा केसानी गळा कापत नाही. तो फक्त कधी भीती दाखवतो,कधी रडतो,कधी पोट दुखे पर्यंत विनोदी बोलून बोलून पिट्टा पाडतो. बायकांच्या मध्ये तो खूप प्रसिध्दी मिळवतो.कारण गावात येणारा आणि दुखा:वर अलगद विनोदी बोलण्याने फुंकर घालणारा तोच एकमेव विनोद बुध्दीचा भाऊराया असतो.कधी अधिकारी,कधी इन्स्पेक्टर, कधी आणखी काही होऊन येतो.त्यांच्या शिकवणूकीतून मी हे काम समाजासाठी हाती घेतले. कसा वाटला मग आजचा साहेब,इन्कमटॅक्स ऑफिसर....!!

**– दत्ता तरलगट्टी सर.**
मुक्त पत्रकार ९८८१६२९०४८

# लाल परीचा मंत्र

राघव एका गरीब शेतकरी कुटुंबातला हुशार मुलगा. त्याचे आई-बाबा ऊन-पावसात शेतात राबायचे. त्यांची एकच इच्छा होती – ''आपला राघव खूप शिकून आधुनिक शेती करेल, आणि आपल्या शेतात सोनं पिकवेल.''

राघवही तेवढाच जिद्दी. शाळेत मन लावून शिकायचा. पण गरीबीचं ओझं त्याच्या खांद्यावर होतंच. त्याचा युनिफॉर्म जुना, वहीची पानं सुटलेली, दप्तर म्हणजे भाजीची पिशवी. बाकीची मुलं मात्र नव्या कपड्यांत, पॉलिश केलेल्या बुटांत, रंगीत दप्तरांसह यायची.

रोज वर्गात कुजबूज व्हायची.

''अरे, भाजीवाला आला बघा.''

''त्याचं दप्तर बघ, कांदे-बटाटे आणायला नेली काय?''

राघव ऐकायचा, पण उत्तर द्यायचा नाही. त्याला माहित होतं, शब्दांनी नाही तर मार्कांनी उत्तर द्यायचं. तो फक्त अभ्यासात डोकं खुपसायचा त्याच्या वादळात एकच मैत्रीचं छत्र होतं – सिया. स्वभावाने मनमिळावू सिया नेहमी राघवला सावरायची.

''राघव, कुत्री भुंकतात म्हणून आपण चालणं सोडत नाही. तू फक्त पुढे बघ.''

शनिवार आला की राघवचं दुःख आणखी वाढायचं. सगळे रंगीबेरंगी कपड्यांत, तो मात्र आईने धुतलेल्या त्याच एका सदऱ्यात. मित्रांची टिंगल, हसणं त्या दिवशी तो खूपच खचला. सियाने समजावलं, पण मनावरचं ओझं काही हलकं होईना.

रात्री अभ्यास करून तो झोपी गेला. रविवारी पहाटेच उठला. आई चुलीवर भाकरी थापत होती. खरपूस भाजीचा खमंग वास अंगणभर पसरला होता. ताज्या दुधासोबत भाकरी खाऊन तो बाबांबरोबर शेतात गेला.

उन्हं चढली तसा एका मोठ्या झाडाखाली विसावला. गार सावलीत डोळा लागला आणि

''राघव ए राघव''

कोणीतरी हळूच हाक मारली. त्याने डोळे उघडले तर समोर लाल रंगाच्या झगमगीत फ्रॉकमधली एक परी उभी. सोनेरी केस, हातात चंदेरी कांडी, डोळ्यात माया.

''घाबरू नकोस. मी लाल परी. तुझी मैत्रीण.'' ती हसून म्हणाली.

राघव अवाक् झाला. परी त्याच्या जवळ बसली आणि म्हणाली, ''राघव, तू हुशार आहेस, मेहनती आहेस. जग काय म्हणतं याकडे लक्ष देऊ नकोस. फक्त एक मंत्र लक्षात ठेव – कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन. तुझं काम फक्त कर्म करणं आहे, फळाची चिंता नको. कष्टाचं फळ उशिरा का होईना, पण मिळतंच.''एवढं बोलून ती डोळ्याचं पातं लवते न लवते तोच परी नाहीशी झाली. ''लाल परी, थांब!'' राघव ओरडला आणि दचकून जागा झाला.



आजूबाजूला पाहिलं तर कोणीच नव्हतं. पण तो मंत्र मात्र मनात कोरला गेला होता.

सोमवारी तो धावत कुलकर्णी बाईंकडे गेला. ''बाई, 'कर्मण्येवाधिकारस्ते' म्हणजे काय हो?'' बाईंनी त्याच्या डोक्यावर हात ठेवला. ''याचा अर्थ असा राघव, की आपण फक्त प्रामाणिकपणे काम करत राहायचं. यश, अपयश, लोक काय म्हणतील याचा विचार करायचा नाही. तू अभ्यास करत राहा, बाकी सगळं आपोआप होईल.''

त्या दिवसापासून राघव बदलला. चेष्टा ऐकून तो आता फक्त हसायचा. त्याचा अभ्यासाचा वेग दुप्पट झाला. वर्षे सरली. तोच राघव दहावीत तालुक्यात पहिला आला. पुढे कृषी महाविद्यालयातून सुवर्णपदक घेऊन बाहेर पडला. गावी परतून त्याने ठिबक सिंचन, सेंद्रिय शेती सुरू केली. त्याच्या शेतात आता बारमाही पीक येऊ लागलं.

आज राघवच्या शेतावर पंचक्रोशीतले शेतकरी शिकायला येतात. गावात त्याने एक शाळाही काढली आहे. जिथे गरीब मुलांना तो मोफत पुस्तकं, गणवेश देतो. आणि शाळेच्या पहिल्याच दिवशी तो मुलांना एकच श्लोक शिकवतो – कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन

आता शनिवारी जेव्हा मुलं रंगीबेरंगी कपड्यांत येतात, तेव्हा राघव सर हसून म्हणतात, ''कपडे माणसाला मोठं करत नाहीत पोरांनो, कष्ट करून माणूस मोठा होतो.'' ज्या हातांनी कधी त्याला 'भाजीवाला' म्हणून चिडवलं, तेच हात आज आदराने नमस्कार करतात.

बोध: निंदा करणारे तेव्हाच गप्प बसतात, जेव्हा आपलं कर्तृत्व बोलू लागतं. गरीबी वाईट नसते, जिद्द नसणं वाईट असतं.

**– सौ रचना गि. वसेकर**
पुणे. ९४२२१७५७४९

# गणू आणि जादूची पणती

गंगा नदीच्या काठी गंगापूर नावाचं एक छोटंसं गाव होतं. त्या गावात छोटा गणू राहायचा. गणू जेमतेम १० वर्षांचा असेल. गणू थोडा बुटका, थोडा जाडा आणि थोडा काळा होता. अभ्यासात तर तो एकदमच कच्चा होता. वर्गात गुरुजींनी प्रश्न विचारला की गणू चेहरा बाकाखाली लपवायचा.

सगळी मुलं त्याला चिडवायची, काळा-बुटका-बुद्धू गणू'' म्हणून. त्यामुळे त्याला खूप वाईट वाटायचे. एकदा एक मित्र त्याला म्हणाला, ''अरे गणू, तू कधीच काही मोठं करू शकणार नाहीस. तू नुसता गोल मोटू काळुराम आहेस.''

हे ऐकून गणूला खूप वाईट वाटले. तो रडत-रडत गावाबाहेरच्या एका पडक्या घराजवळ गेला. भिंतीकडे पाहत रडत असताना त्याला तिथे एक मोडकी पणती पडलेली दिसली.

ती पणती जादूची होती. ती चालत गणूजवळ आली. गणू घाबरला. तेव्हा ती म्हणाली, गणू, घाबरू नकोस. मी जादूची पणती आहे. मी सर्वांना मदत करत असते.''

मग थोडं गणूला बरं वाटलं. गणू हसताच त्या पणतीतून पिवळा प्रकाश आला आणि दिवा लागला.

ती पणती गणूला म्हणाली, ''मी येथे एकटी असते. तू इकडे आलास, मला आनंद झाला. तुला एखादा वर पाहिजे असेल तर मी तुला देऊ शकते. तू रडत जाऊ नकोस.''आणि तुला

सांगते कुणाचे रंग रूप
बदलत नसते,आपण व्यवस्थित
टापटीप रहायचे असते

गणू बरं म्हणाला, पण

मला एक वर दे,वर्गात सगळ्यात हुशार बनव. म्हणजे कुणी चिडवणार नाही.

तेव्हा पणती म्हणाली, ''अरे गणू, हुशारी मी तुला देऊ शकत नाही रे बाळा. पण मी तुला ही जादूची वात देते. रोज रात्री तू जेवढा वेळ अभ्यास करशील, तेवढा वेळ ही वात जळत राहील. पण अट एकच – तू अभ्यास मनापासून केला पाहिजे, नाटक केलं तर वात विझेल.''

गणूने मान डोलावली. त्या रात्रीपासून गणू रोज अभ्यासाला बसू लागला. पहिल्या दिवशी वात १० मिनिटांत विझली. दुसऱ्या दिवशी १५ मिनिटे. गणूला कळलं – या वातीला खोटं आवडत नाही.

हळूहळू गणूने अभ्यासाची वेळ वाढवली आणि तो मन लावून अभ्यास करू लागला. गणिताची कोडी सोडवू लागला, कविता पाठ करू लागला. वात आता २ तास तेवायची.

६ महिन्यांनी शाळेत परीक्षा झाली. निकालाच्या दिवशी गुरुजींनी नाव पुकारलं,

पहिला आला होता
– गणेश गणपत गणपुत्र

सगळा वर्ग अवाक झाला. चिडवणारी मुलं आता टाळ्या वाजवत होती. गणू धावत घरी गेला आणि त्या पणतीच्या आणि आई-बाबांच्या पाया पडला.

तेव्हा पणती त्याच्याशी बोलताना त्याला एकट्यालाच ऐकू आले, ''बघ गणू, मी तुला हुशार बनवलं नाही,तू स्वतःच्या मेहनतीने बनलास. मी फक्त वात दिली, कष्टाचे तेल तू त्यात ओतलंस. आणि एकदम गणू स्वप्नातून जागा झाला.

तेवढ्यात पणती गायब झाली. त्याच्या हातात फक्त एक चिठ्ठी देऊन गेली. त्यावर लिहिलं होतं,


जगातला सगळ्यात मोठा जादूगार सराव असतो.

आणि सगळ्यात मोठा दिवा जिद्द असते. ती प्रत्येकाच्या मनात असतेच, फक्त तिला प्रेरणा मिळायची गरज असते. पुढे प्रामाणिक अभ्यास व कष्ट करून गणू मोठपणी कलेक्टर झाला.

बोध: मुलांनो, कुणीही जन्मतः हुशार किंवा ढ नसतं. रोज थोडी मेहनत केली, सराव केला, कष्ट केले की आपण हुशार होतो आणि आपलं आयुष्य घडतं.




**– गिरीश खं.वसेकर**
नांदेड सिटी, सिंहगड रोड, पुणे
९४२२६५९४००









सकाळी सकाळी

सकाळी सकाळी बघा
किती जण येऊन गेली
उठा उठा ,सकाळ झाली
गुड मॉर्निंग करून गेली ।

टेरेस मध्ये फुलं फुललेले
बघून मला गालात हसले
बागेत फेरी सकाळी सकाळी
भेटे फुलपाखरू देई टाळी ।

भुर्रकन चिऊताई आली
बाळा खाऊ घेऊन गेली
म्यांव म्यांव आली मनीमाऊ
म्हणे, चल आपण दूध घेऊ ।

आजीने दिली गरम पोळी
एकेक घास, गट्टम पोळी
रोज करी नवा एक खाऊ
खरं, सुट्टीचे मजा रे भाऊ ।

डुलत डुलत आबा आले
हातात गोष्टीचे बुक दिले
सुट्टीचा आराम, म्हणे आई
मी पण करीत नाही घाई ।

कवी अरुण वि.देशपांडे पुणे
9850177342



चिमणीचे पिल्लू आणि मिनू
************

चिमणीचे एक पिल्लू
उडाले भर उन्हात
दिसेना झाले ते
कुठे गेले क्षणात?

थोडे जाता पुढे ते
पडले येऊन चक्कर
खिडकीतून पाहता
आली मिनू भरभर

येताना मिनूने बाटलीत
आणले थोडे पाणी
त्या पिल्याच्या मुखी
टाकले चिमुकल्या हातांनी

थेंब थेंब पाणी पिऊन
बरे वाटले त्या पिल्लाला
हालचाल केली त्याने
आनंद झाला मिनुला

काही क्षणात नंतर
पिल्लाने मिनुकडे पाहिले
मनातल्या मनात जणू
त्याने धन्यवाद दिले

अश्या रीतीने मिनूने
पिल्लाचा वाचविला जीव
काही चिमण्या गोळा झाल्या
आनंदाने करू लागल्या
चिवचिव

पुढच्या अवघ्या क्षणात
घरट्याकडे पिल्लू उडून गेले
शाळेत कळता शिक्षकांना
त्यांनी मिनुला सन्मानित केले

गिरीश खं.वसेकर
नांदेड सिटी, पुणे
९४२२६५९४००